दैनिक अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २९६
। रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## सहायक पोलिस आयुक्त संदीप मिटके यांना 'उत्कृष्ट अन्वेषण पदक' जाहीर



अहिल्यानगर व नाशिक येथे गुन्हे तपासात उल्लेखनीय कामगिरी बजावणारे नाशिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त श्री. संदीप मिटके यांची केंद्रीय गृह मंत्रालयाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'उत्कृष्ट अन्वेषण पदका'साठी निवड झाली आहे. महाराष्ट्रातील एकूण २२ पोलिस अधिकाऱ्यांची या प्रतिष्ठेच्या पदकासाठी निवड करण्यात आली आहे. सन २०२३ आणि २०२४ या कालावधीत अहिल्यानगर तसेच नाशिक येथे कार्यरत असताना श्री. मिटके यांनी केलेल्या उत्कृष्ट तपास कार्याची आणि गुन्हे अन्वेषणातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेण्यात आली. विविध गुन्ह्यांचा शास्त्रोक्त व प्रभावी पद्धतीने तपास करून आरोपींना कायद्याच्या कक्षेत आणण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना 'उत्कृष्ट अन्वेषण पदक' जाहीर झाले असून, राज्याचे पोलिस महासंचालक यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल पोलिस दलातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## महत्वाचे

### भारताची हवाई ताकद वाढणार; सहाव्या पिढीचे लढाऊ विमान!

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

नवी दिल्ली : भारताने भविष्यातील हवाई युद्धाची तयारी सुरू केली असून, फ्रान्सच्या नेतृत्वाखाली विकसित होत असलेल्या सहाव्या पिढीच्या लढाऊ विमानांच्या 'फ्युचर कॉम्बॅट एअर सिस्टीम' (ऋउअड) कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याबाबतची माहिती संरक्षण मंत्रालयाने संसदीय स्थायी समितीला दिली आहे.

भारताकडून फ्रान्सच्या नेतृत्वाखालील ऋउअड कार्यक्रमाचा सखोल विचार केला जात असून, त्याचबरोबर ब्रिटन, इटली आणि जपान यांच्या 'ग्लोबल कॉम्बॅट एअर प्रोग्राम' (ऋउअझ) चेही मूल्यांकन करण्यात येत आहे. भविष्यातील सुरक्षा आव्हाने लक्षात घेऊन २०४० पर्यंत भारतीय हवाई दलाची क्षमता अधिक सक्षम करण्याचा या प्रयत्नांचा उद्देश आहे.

सहाव्या पिढीच्या लढाऊ विमानांमध्ये अत्याधुनिक स्टेल्थ तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित निर्णयक्षमता, मानवरहित 'लॉयल विंगमन' ड्रोन आणि नेटवर्क-केंद्रित युद्धक्षमता यांचा समावेश असणार आहे. त्यामुळे भविष्यातील युद्धपद्धतीत मोठे बदल होण्याची शक्यता आहे.

# २४ वर्षानंतर आरबीआयची 'नागरी'ला दारे खुली!

## नव्या नागरी सहकारी बँकांना परवान्याचा मार्ग मोकळा; महाराष्ट्र, गुजरातसह सहकार क्षेत्राला मोठी चालना

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

**नागपूर** : सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने तब्बल २४ वर्षांनंतर नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याचा मार्ग खुला केला आहे. गेल्या काही दशकांत सहकारी बँकांमधील आर्थिक गैरव्यवहार, घोटाळे आणि ठेवीदारांच्या पैशांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर नव्या नागरी सहकारी बँकांना परवाने देण्याबाबत आरबीआयने कठोर भूमिका घेतली होती. आता मात्र अत्यंत कडक आर्थिक निकषांच्या आधारे नव्या बँकांना परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयामुळे महाराष्ट्र आणि गुजरातसारख्या सहकार चळवळ मजबूत असलेल्या राज्यांमध्ये नव्या नागरी सहकारी बँकांच्या स्थापनेला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांत एकापाठोपाठ एक नागरी सहकारी बँकांवर आरबीआयकडून निर्बंध लादले जात असताना आता नव्या बँकांना परवानगी देण्याचे धोरण स्वीकारण्यात आल्याने सहकारी बँकिंग क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात होण्याची चिन्हे आहेत.



नव्या नागरी सहकारी बँकेचा परवाना मिळविण्यासाठी अर्ज करणारी संस्था 'मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज अ‍ॅक्ट, २००२' अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक राहणार आहे. संबंधित पतसंस्था किमान १० वर्षांपासून कार्यरत असणेही बंधनकारक आहे.

याशिवाय अर्जदार संस्थेकडे किमान १० हजार कोटी रुपयांच्या ठेवी आणि ३०० कोटी रुपयांची निव्वळ मालमत्ता असणे आवश्यक आहे. मागील पाच वर्षांतील आर्थिक कामगिरी सातत्यपूर्ण आणि समाधानकारक असावी. संस्थेचा सीआरएआर किमान १२ टक्के, तर नेट एनपीए तीन टक्क्यांपेक्षा अधिक नसावा, अशा कठोर अटी घालण्यात आल्या आहेत.

### 'आरबीआयचा दृष्टिकोन बदलला'

काही वर्षांपूर्वीपर्यंत देशात आणि राज्यात एकापाठोपाठ एक नागरी सहकारी बँकांवर आरबीआयचे निर्बंध लादले जात होते. आर्थिक गैरव्यवहार आणि तोट्यामुळे अनेक बँकांमधील ठेवीदारांच्या ठेवी अडकून पडत होत्या. मात्र आता आरबीआयने सहकारी बँकिंग क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याचे या निर्णयातून दिसून येते. त्यामुळेच तब्बल २४ वर्षांनंतर नव्या नागरी सहकारी बँकांसाठी परवान्याची दारे खुली झाली आहेत.

-विवेक जुगादे,
राज्याच्या सहकार धोरण विषयक उच्चस्तरीय समितीचे सदस्य

सहकारी संस्थेतील कोणत्याही एका संचालकाचे अथवा सदस्याचे भागभांडवल पाच टक्क्यांपेक्षा अधिक नसावे, अशीही अट ठेवण्यात आली आहे. त्यामुळे केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने सक्षम संस्थांनाच नव्या नागरी सहकारी बँकेसाठी परवानगी मिळण्याची शक्यता आहे. (पान ४ वर)

## हजार युवकांमध्ये फक्त १२ जणांना कायमस्वरुपी नोकरी

# भारतात रोजगाराचे सर्व मार्ग बंद : राहुल गांधी

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

**प्रयागराज** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रयागराजमध्ये छात्रों की गुंज कार्यक्रमात तरुणाईला संबोधित केलं. राहुल गांधी म्हणाले की अलाहाबाद विद्यापीठ देशातील सर्वात चांगलं विद्यापीठ होतं.

आज मी तुमच्यासोबत वेदना, डेटा आणि दौलत यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आल्याचं म्हटलं. भारताकडे जगातील सर्वात मोठी युवा शक्ती आहे, हे देशाचं सामर्थ्य आहे. अमेरिका, रशिया आणि चीनची चर्चा होती मात्र



ते भारताच्या तरुणाईपुढं काहीच नाहीत, असं राहुल गांधी यांनी म्हटलं. देशात १ हजार तरुणांपैकी १२ जणांना कायमस्वरुपी नोकरी मिळते, असंही राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी म्हणाले की विद्यार्थी अभ्यास करतात, शिक्षण घेतात पैसे खर्च करतात. मात्र, भारतात रोजगाराचे सर्व मार्ग बंद करण्यात आले आहेत. आज जगात तुम्ही मेड इन चाइना, मेड इन बांग्लादेश दिसेल मात्र मेड इन इंडिया दिसत नाही. याचं कारण नोटबंदी आणि चुकीच्या प्रकारे लागू करण्यात आलेली जीएसटी हे आहे. यामुळं व्यापाऱ्यांचं खूप नुकसान झालं. सरकारी नोकऱ्यांचे पेपर लीक होतात. १५० तरुणांपैकी केवळ एका युवकाला नोकरी मिळते, असे राहुल गांधी म्हणाले.

भारताची ताकद युवक आहेत, तेच भारताची शक्ती आहेत. मी भारतातील प्रत्येक नागरिक आणि युवकाची गोष्ट सांगतोय, असं राहुल गांधी म्हणाले. देशातील ४० कोटी युवक भारताची सर्वात मोठी ताकद आहे, असं राहुल गांधींनी म्हटलं. अमेरिका, चीन आणि रशियातील कोणीही भारताच्या युवकांच्या सामर्थ्याचा सामना करु शकत नाही, असंही त्यांनी म्हटलं.

(पान ४ वर)

# कॉकरोच जनता पार्टीविरोधात दोन तरुणांचे उपोषण

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

संभाजीनगर : कॉकरोच जनता पार्टी (उगझ)च्या कार्यपद्धती आणि नेतृत्वावर गंभीर प्रश्न उपस्थित करत मनीष ब्रह्मभट आणि राहुल पांड्या या दोन तरुणांनी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आज तिसरा दिवस असून, उगझचे नेतृत्व करणारे अभिजीत दिपके यांच्या कार्यपद्धतीवर त्यांनी आरोप केले आहेत.




देशातील तरुणाईच्या विविध प्रश्नांसाठी सुरू करण्यात आलेले हे आंदोलन काही मोजक्या व्यक्तींपुरते मर्यादित ठेवले जात असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. आंदोलनाला देशभरातून तरुणांचा पाठिंबा मिळत असताना, (पान ४ वर)

## महापालिका कर्मचाऱ्यावरील हल्ला प्रकरण

# युनूस शेखला तीन दिवसांची पोलीस कोठडी

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : मुकुंदनगर येथील दर्गा डायरा परिसरात महापालिका कर्मचारी धीरज परदेशी यांच्यावर ७ ऑगस्ट रोजी झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी युनूस शेख याला अटक केली आहे. शनिवारी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या हल्ल्यात परदेशी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर नगरमधील मॅक केअर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती




चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. युनूस शेख याच्यासह मेहराज असलम सय्यद, सिराज असलम सय्यद आणि मुस्तकीन असलम सय्यद यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. अन्य तीन आरोपी हल्ल्यानंतर फरार झाले असून त्यांच्या शोधासाठी पोलिसांची दोन स्वतंत्र पथके रवाना करण्यात आली आहेत.

पोलिसांनी शनिवारी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. हल्ल्यामागील नेमके कारण काय, तसेच या घटनेत आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. जिल्हा पोलीस प्रमुख सुदर्शन, शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक(पान ४ वर)

# जप्त केलेला डीजे चक्क पोलीस ठाण्यातूनच चोरण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : पोलीस ठाण्याच्या आवारात जप्त करून ठेवलेला डीजे संच चोरून नेणाऱ्या पाच जणांना भिंगार कॅम्प पोलिसांनी रंगेहात पकडले. या कारवाईत पोलिसांनी त्यांच्याकडून टेम्पोसह ४ लाख रुपयांचे डीजे साहित्य असा एकूण ६ लाख रुपयांच्या मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, दि. २ ऑगस्ट रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती मिरवणुकी दरम्यान निंबोडी येथे विनापरवाना आणि जास्त आवाजात डीजे वाजवला जात होता. त्यामुळे पोलिसांनी साई २१ प्लस नावाचा डीजे संच, आयशर टेम्पोसह ताब्यात घेऊन नगर तालुका पोलीस ठाण्याच्या आवारात सुरक्षेसाठी लावून ठेवला होता. दरम्यान ७ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वा. सुमारास नगर तालुका पोलीस ठाण्याच्या आवारातून काही जण जितो टेम्पोमध्ये (क्र.एम एच १६ सीसी ३८०) जप्त केलेले डीजे साहित्य घेऊन जात असल्याची माहिती भिंगार कॅम्प पोलिसांना मिळाली.

पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पोलीस कॉलनी जवळ संशयित टेम्पो अडवला. टेम्पोची पाहणी केली असता त्यात नगर तालुका पोलीस ठाण्याचे आवारातून चोरलेले डीजे बॉक्स, आयशर टेम्पो आढळून आला. पोलिसांनी टेम्पो चालक सोमनाथ देविदास भिंगारदिवे यांच्यासह अतुल राजू शेंडगे, अजय सुरेश साबळे, मिनीनाथ मच्छिंद्र आवारे (सर्व रा. निंबोडी ता. नगर) आणि प्रथमेश नितीन पवार (रा. मंगळवार पेठ, कराड, जि. सातारा) या पाच जणांना ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलिस अंमलदार नंदकुमार पठारे यांच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

# आकर्षक पॅकिंगच्या आड बनावट तेलाचा गोरखधंदा

## बीडमध्ये १ कोटी ९४ लाखांचा साठा जप्त; पाच युनिट्स सील

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

बीड : आकर्षक पॅकिंग, भुलवणारी नावे आणि ग्राहकांची दिशाभूल करून निकृष्ट व बेकायदा खाद्यतेल बाजारात विक्री करण्याचा प्रकार बीड जिल्ह्यात उघडकीस आला आहे. अन्न व औषध प्रशासनाने (ऋृअ) बीड शहर, वडवणी आणि माजलगाव परिसरात एकाचवेळी धडक कारवाई करत तब्बल १ कोटी ९४ लाख ५० हजार ९२२ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत तब्बल १ लाख १९ हजार १८६ किलो खाद्यतेलाचा साठा ताब्यात घेण्यात आला असून संबंधित पाचही आस्थापनांचे परवाने निलंबित करून युनिट्स सील करण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळयुक्त खाद्यपदार्थ, बेकायदा साठवणूक आणि नियमबाह्य उत्पादन-विक्री करणाऱ्यांविरोधात कारवाईला वेग आला आहे. त्याच मोहिमेचा एक भाग म्हणून बीड जिल्ह्यात ही मोठी कारवाई करण्यात आली. प्रशासनाच्या या कारवाईमुळे खाद्यतेलाच्या व्यवसायातील अनियमितता करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### भेसळखोरांची गय नाही

नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या तसेच बनावट, भेसळयुक्त किंवा बेकायदा खाद्यतेलाची निर्मिती, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील खाद्यतेल व्यावसायिकांमध्ये या कारवाईने मोठी खळबळ उडाली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रशासनाची नजर राहणार आहे.

### पाचही युनिट्स सील

नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने संबंधित पाचही आस्थापनांचे परवाने तातडीने निलंबित केले आहेत. तसेच संबंधित दुकाने आणि ऑइल रिपॅकिंग युनिट्स सील करण्यात आली आहेत. जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून त्याच्या गुणवत्तेबाबतचा अहवाल आल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

### १ कोटी ९४ लाखांचा मुद्देमाल जप्त

या पाचही ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत १ लाख १९ हजार १८६ किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले. या संपूर्ण कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत १ कोटी ९४ लाख ५० हजार ९२२ रुपये असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलाचा साठा जप्त झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

### पॅकिंग बदलून ग्राहकांची दिशाभूल

कारवाई दरम्यान खाद्य तेलाचा मोठ्या प्रमाणावर साठा आढळून आला. तेलाला 'रिफाइंड' आणि 'अल्ट्रा रिफाइंड' अशी आकर्षक नावे देऊन तसेच पॅकिंगमध्ये बदल करून ग्राहकांना आकर्षित केले जात असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. एकाच प्रकारच्या तेलाचे वेगवेगळ्या नावांनी व आकर्षक स्वरूपातील पॅकिंग करून बाजारात वितरण केले जात असल्याचा संशय या कारवाईतून समोर आला आहे.

### पाच ठिकाणी छापे

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने बीड शहरातील दोन ऑइल रिपॅकिंग युनिट, वडवणी येथील एका आस्थापना आणि माजलगावमधील सुट्टे खाद्यतेल साठवणाऱ्या दोन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत स्वागत ऑइल इंडस्ट्रीज आणि चरखा ऑइल मिल (बीड), जय हनुमान ट्रेडर्स (वडवणी), जानवी कमर्शियल आणि विनायक ऑइल मिल (माजलगाव) या पाच आस्थापनांवर कारवाई करण्यात आली.

## गंज बाजारातील गाळे १५ दिवसात खाली करा

# महापालिकेच्या नोटीसीने व्यापारी हादरले

प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील गंज बाजार येथील महापालिकेच्या मालकीच्या शॉपिंग सेंटर मधील गाळेधारकांना १५ दिवसात हे गाळे खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. १५ दिवसात गाळे खाली करून न दिल्यास महापालिकेच्यावतीने हे गाळे ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे या नोटिसीमध्ये म्हटले आहे.

नगर शहरातील गंज बाजार येथे महापालिकेचे शॉपिंग सेंटर आहे. या शॉपिंग सेंटर मधील गाळे आणि ओटे महापालिकेने १४१ व्यावसायिकांना भाडे करारावर दिलेले होते. त्यातील सर्वांचे भाडेकरार संपलेले असून नव्याने करारनामे करण्यात आलेले नाहीत. तसेच या शॉपिंग सेंटरचीही दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे तेथे नवीन शॉपिंग सेंटर उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असल्याचे समजते.



दरम्यान येथील व्यवसायिकांची भाडे कराराची मुदत संपलेली असल्यामुळे हे गाळे आणि ओटे खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

व्यावसायिकांना दिलेल्या नोटिशीमध्ये म्हटले आहे की, महापालिकेच्या मालकीचे गंज बाजार शॉपिंग सेंटर मधील गाळेधारकांची भाडे पद्धतीची मुदत १५ ऑक्टोबर १९९७ रोजी संपली आहे. त्यामुळे आपण सदर गाळ्यांचा अनाधिकृतपणे वापर करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच आपणावर संदर्भ क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ८१ ब ची नोटीस बजावण्यात आली आहे. १५ दिवसात गाळा खाली करावा, मुदतीत गाळा खाली करून न दिल्यास महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ८१ ब २ नुसार सदरच्या गाळा ताब्यात घेण्याबाबत कारवाई करण्यात येईल. महानगरपालिकेने गाळेधारकांना बजावलेल्या या नोटीसीमुळे गाळेधारकांमध्ये एकच तारांबळ उडाली आहे.

# ई-२०चा संभ्रम दूर करणार कोण?

## इथेनॉलच्या इंधनात देशाची ऊर्जा-सुरक्षा की ग्राहकांची परीक्षा; 'विश्वास' हीच आता खरी कसोटी

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

पेट्रोलच्या पंपावर वाहन उभे आहे; पण वाहनचालकाच्या मनात मात्र एक प्रश्न धुमसत आहे की, 'ई-२० पेट्रोल सुरक्षित आहे का?' गेल्या काही दिवसांपासून हा प्रश्न केवळ वाहनधारकांचा राहिलेला नाही; तो केंद्र सरकारचे इंधन धोरण, तेल कंपन्यांची जबाबदारी, वाहन उद्योगाची भूमिका आणि ग्राहकांच्या विश्वासाचा प्रश्न बनला आहे. ई-२० म्हणजे पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉलचे मिश्रण. भारताने हे लक्ष्य निर्धारित मुदतीच्या पाच वर्षे आधी, २०२५ मध्ये गाठल्याचे केंद्र सरकारने म्हटले आहे. २०१३-१४ मध्ये पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रण दीड टक्क्यांपेक्षाही कमी होते; ते २०२५-२६ मध्ये २० टक्क्यांपर्यंत पोहोचले. सरकारच्या मते, यामुळे कच्च्या तेलावरील आयात अवलंबित्व कमी झाले, परकीय चलनाची बचत झाली आणि देशांतर्गत इथेनॉल उत्पादनाला चालना मिळाली.

म्हणून ई-२०मागील धोरण पूर्णपणे अव्यवहार्य आहे, असे म्हणणे तथ्याला धरून ठरणार नाही. मात्र धोरण योग्य असणे आणि त्याची अंमलबजावणी प्रत्येक थेंबाच्या गुणवत्तेसह योग्य असणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अलीकडे ई-२० पेट्रोलमध्ये मोठ्या प्रमाणात क्लोराईड आणि पाणी असल्याच्या चर्चेने वाहनधारकांमध्ये चिंता निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी देशभर अतिरिक्त तपासण्या केल्या. रिफायनरीमधून घेतलेल्या शंभरहून अधिक नमुन्यांमध्ये क्लोराईडचे प्रमाण एक पीपीएम किंवा त्याहून कमी आढळल्याचे कंपन्यांनी सांगितले. देशभरातील ८० डिस्टिलरीमधून घेतलेल्या इथेनॉलच्या नमुन्यांमध्येही क्लोराईड तीन पीपीएमपेक्षा कमी असल्याचा दावा करण्यात आला. डेपो आणि टर्मिनल स्तरावरील नमुन्यांमध्येही तीन पीपीएमपेक्षा कमी प्रमाण आढळल्याचे कंपन्यांचे म्हणणे आहे. पेट्रोल पंपांवरील तपासणीही वाढविण्यात आली असून, पाण्याचे प्रमाण आणि इंधनाची घनता दिवसातून अनेक वेळा तपासली जात असल्याचे तेल कंपन्यांनी सांगितले आहे. काही ठिकाणी क्लोराईडचे प्रमाण जास्त आढळल्यास पुरवठा थांबविण्यात आल्याचाही दावा आहे. हे स्पष्टीकरण महत्त्वाचे आहे. पण इथेच प्रश्न संपत नाहीया चाचण्यांचे निकाल स्वतंत्रपणे सार्वजनिक होतील का? नमुने कोणत्या पद्धतीने घेतले? कोणत्या प्रयोगशाळांनी तपासले? तपासणीचा कालावधी किती? आणि ग्राहकांना हे आकडे नियमितपणे उपलब्ध करून दिले जाणार आहेत का? विश्वास निर्माण करण्यासाठी केवळ 'चिंतेचे कारण नाही' एवढे सांगणे पुरेसे नाही; पारदर्शक आकडेवारी हवी. या संपूर्ण वादात एक महत्त्वाचा फरक लक्षात घ्यायला हवा. इथेनॉल मिश्रित पेट्रोल या संकल्पनेला विरोध आणि निकृष्ट अथवा दूषित इंधनाला विरोध या दोन गोष्टी समान नाहीत. भारतीय मानक ब्युरोने ई-२० इंधनासाठी स्वतंत्र मानक निश्चित केले आहे. आयएस १७०२१:२०१८मध्ये निर्जल इथेनॉल आणि पेट्रोलच्या २० टक्के मिश्रणासाठी इंधनाची गुणवत्ता, नमुना घेण्याच्या पद्धती आणि चाचण्यांचे निकष दिले आहेत. म्हणजेच ई-२० हे 'मनमानी मिश्रण' नसून त्यासाठी तांत्रिक मानके अस्तित्वात आहेत. आता खरी गरज आहे ती मानक कागदावर राहू न देता रिफायनरीपासून पंपापर्यंत प्रत्येक टप्प्यावर काटेकोरपणे लागू करण्याची.

भारत एकटाच इथेनॉलकडे वळलेला देश नाही. अमेरिकेत ई-१० हे सर्वाधिक प्रचलित मिश्रण आहे आणि ते जवळपास सर्व पेट्रोल वाहनांसाठी मान्य आहे. ई-१५ विशिष्ट वाहनांसाठी मंजूर आहे, तर ई-८५साठी विशेष फ्लेक्स-फ्युएल वाहने आवश्यक असतात. अमेरिकेत ई-१५ विक्रीसाठी पंपांवर स्पष्ट लेबलिंग, इंधन गुणवत्ता सर्वेक्षण आणि विशिष्ट उपकरणांच्या अटीही आहेत. ब्राझीलचा अनुभव तर भारतासाठी विशेष अभ्यासाचा विषय आहे. तेथे २०२५ पासून पेट्रोलमध्ये ३० टक्के इथेनॉलचे ई-३० मिश्रण लागू करण्यात आले आणि जुलै २०२६मध्ये ते तात्पुरते ३२ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा निर्णय झाला. मात्र त्याआधी वाहनांवरील तांत्रिक चाचण्या, इंधनाच्या वैशिष्ट्यांमधील बदल आणि नियामक तयारी करण्यात आली होती.

युरोपियन संघाचा दृष्टिकोन आणखी वेगळा आहे. तेथे जैवइंधनाचा वापर केवळ 'पेट्रोलमध्ये किती टक्के मिसळले' यावर मोजला जात नाही; २०३०पर्यंत वाहतूक क्षेत्रातील अक्षय ऊर्जेचा वाटा, उत्सर्जनाची तीव्रता आणि जैवइंधनाच्या स्रोताची शाश्वतता यावरही भर आहे. यातून एक धडा स्पष्ट होतोइथेनॉलचे प्रमाण वाढवणे हा धोरणाचा केवळ एक भाग आहे; इंधन गुणवत्ता, वाहन सुसंगतता, पायाभूत सुविधा, ग्राहक माहिती आणि स्वतंत्र नियमन हे त्याचे अनिवार्य भाग आहेत. इथेनॉलचे ऊर्जा-घनत्व पेट्रोलपेक्षा कमी असल्यामुळे मिश्रणात इथेनॉलचे प्रमाण वाढल्यास काही वाहनांमध्ये इंधन कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो. केंद्र सरकारनेही ई-२०मुळे ई-१०साठी तयार केलेल्या आणि ई-२०साठी अनुरूप केलेल्या वाहनांमध्ये इंधन कार्यक्षमतेत किरकोळ फरक पडू शकतो, असे नमूद केले आहे. म्हणून ग्राहकाने 'पेट्रोलचा भाव' एवढेच गणित न करता एका लिटरमागे वाहन किती किलोमीटर धावते, हेही पाहणे आवश्यक आहे. सरकारनेही ई-२०मुळे होणाऱ्या संभाव्य कार्यक्षमतेतील बदलाची स्पष्ट, वाहनप्रकारनिहाय आणि स्वतंत्र माहिती सार्वजनिक करणे गरजेचे आहे.

त्यासाठी पहिल्यांदा रिफायनरीपासून पेट्रोल पंपापर्यंत ई-२०च्या प्रत्येक टप्प्याची नियमित, स्वतंत्र आणि सार्वजनिक तपासणी झाली पाहिजे. दुसरे सगळ्यात महत्त्वाची असेल तर पारदर्शकता. तेल कंपन्यांनी नमुने किती घेतले, कुठून घेतले, कोणत्या प्रयोगशाळेत तपासले आणि निकाल काय आले, याची नियमित माहिती सार्वजनिक करावी. फक्त संकटाच्या वेळी प्रसिद्धीपत्रक काढण्यापेक्षा कायमस्वरूपी गुणवत्ता डॅशबोर्ड निर्माण करणे अधिक विश्वासार्ह ठरेल. त्यापाठोपाठ ग्राहकाचा पर्याय आणि माहितीचा अधिकार. कोणते वाहन ई-२०साठी तयार आहे, जुन्या वाहनांवर त्याचा संभाव्य परिणाम काय, देखभालीत काय बदल अपेक्षित आहेत, याची माहिती वाहन कंपन्या आणि सरकारने सहज उपलब्ध करून द्यावी. भारताला कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करायचे असेल, शेतकऱ्यांना इथेनॉलच्या बाजारपेठेशी जोडायचे असेल आणि जैवइंधनाच्या माध्यमातून ऊर्जा-सुरक्षेला बळ द्यायचे असेल, तर इथेनॉल मिश्रणाचे धोरण आवश्यक ठरू शकते. पण कोणतेही धोरण लोकांच्या विश्वासाशिवाय दीर्घकाळ टिकत नाही. आज सरकार म्हणते की, ई-२० सुरक्षित आहे. तेल कंपन्या म्हणततातचाचण्यांमध्ये क्लोराईडची पातळी निर्धारित मर्यादेत आहे. वाहन उद्योगातील काही चिंता व्यक्त झाल्या आणि त्यानंतर त्या दाव्यांपैकी काही मागेही घेण्यात आले. म्हणून आता गरज सरकार विरुद्ध ग्राहक, तेल कंपन्या विरुद्ध वाहन उद्योग अशी लढाई उभी करण्याची नाही. गरज आहे ती तिसऱ्या मार्गाचीपुराव्यावर आधारित सार्वजनिक विश्वासाची.ई-२० हा केवळ पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचा विषय नाही. तो भारताच्या ऊर्जा-स्वावलंबनाचा, शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेचा, वाहन तंत्रज्ञानाचा आणि सामान्य नागरिकाच्या खिशाचा विषय आहे. त्यामुळे सरकारने 'ई-२०वर विश्वास ठेवा' एवढेच न म्हणता 'हा विश्वास ठेवण्यासाठी ही आकडेवारी, हे मानक आणि ही तपासणी तुमच्यासमोर आहे', असे म्हणण्याची वेळ आली आहे.कारण इंधनाच्या टाकीत जाणारा प्रत्येक थेंब केवळ पेट्रोल नसतो; तो ग्राहकाच्या विश्वासाचा थेंबही असतो. आणि तो विश्वास दूषित होऊ न देणे, हीच ई-२० धोरणाची खरी परीक्षा आहे.

# चिखलाच्या विळख्यातून पानोडीकरांची सुटका

## पुणे-शिर्डी महामार्गाच्या रखडलेल्या कामाला अखेर मुहूर्त!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी |** पुणे-शिर्डी प्रवासासाठी पर्यायी मार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आश्वी-पानोडी-शिबलापूर महामार्गावरील रखडलेल्या कामामुळे ग्रामस्थांना सोसाव्या लागणाऱ्या त्रासाची अखेर प्रशासनाने दखल घेतली आहे. गेल्या दीड वर्षांपासून रेंगाळलेल्या पानोडी गावठाण ते शिबलापूर या टप्प्यातील रस्त्याच्या कामाला अखेर मुहूर्त लाभला असून, कामाला वेग आल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. पुणे-शिर्डी या मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी या महामार्गाचे काम हाती घेण्यात आले होते. मात्र, पानोडी गावठाण ते शिबलापूर या दरम्यानचा रस्ता खोदून ठेवल्याने पावसाळ्यात या भागात 'चिखलाचे साम्राज्य' पसरले होते. उन्हाळ्यात धूळ आणि पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून वाट काढताना शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध आणि वाहनचालकांना अक्षरशः नरकयातना सहन कराव्या लागत होत्या. शेतकरी आणि दूध उत्पादकांना आपले वाहन या चिखलातून बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागत होती. एकीकडे महामार्गाचे काम रखडलेले असतानाच, दुसरीकडे निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याच्या कामासाठी मुरुम वाहतूक करणाऱ्या मोठ्या डंपरची या मार्गावरून सतत वर्दळ सुरू होती. चिखलामुळे निसरड्या झालेल्या रस्त्यावर या अवजड वाहनांमुळे अपघाताची भीती निर्माण झाली होती. यामुळे महिला व मुलांना जीव मुठीत धरून चालावे लागत होते. रस्त्याच्या दुरवस्थेबाबत ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करून आपला संताप व्यक्त केला होता. पावसाळ्यापूर्वी नियोजन न केल्याने ही परिस्थिती ओढावल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात होता. या पार्श्वभूमीवर, संबंधित विभागाने तातडीने हालचाली करत शिबलापूर ते पानोडी या रखडलेल्या टप्प्याचे काम सुरू केले आहे.

सध्या या मार्गावरील कामाला युद्धपातळीवर सुरुवात झाली असून, चिखलाचा उपद्रव कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर पुणे-शिर्डी प्रवासाचा वेळ वाचणार असून, पानोडी पंचक्रोशीतील दळणवळणाचा प्रश्नही मार्गी लागणार आहे. रखडलेल्या कामाला मुहूर्त मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, आता हे काम निकृष्ट दर्जाचे न होता वेळेत पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# देशसेवेतून निवृत्त मेजर माळी यांचे टाकळीभानमध्ये जंगी स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** भारतीय सैन्यात २१ वर्षांची प्रदीर्घ देशसेवा बजावून निवृत्त झालेले टाकळीभानचे सुपुत्र मेजर ज्ञानेश्वर माळी यांचे गावात आगमन होताच १९९८ सालच्या दहावीच्या वर्गमित्रांनी जंगी स्वागत करून सत्कार केला. तब्बल २८ वर्षांनंतर मित्रांची भेट झाल्याने मेजर माळी यांच्यासह मित्रपरिवाराच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

मेजर माळी यांनी टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व अण्णासाहेब पाटील कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेतले. रयत शिक्षण संस्थेच्या अहिल्याबाई होळकर वसतिगृहात राहून त्यांनी पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर देशसेवेत दाखल होऊन त्यांनी २१ वर्षे कर्तव्य बजावले. सत्कारावेळी बापूसाहेब नवले यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत मेजर माळी यांच्या देशसेवेचा गौरव केला. मित्रांनी केलेला सन्मान आणि आई-वडिलांचाही केलेला गौरव याबद्दल मेजर माळी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी आई-वडील, बहीण, मुले तसेच मित्रपरिवार उपस्थित होता. उपसरपंच कान्होबा खंडागळे, भाऊसाहेब पवार, विजय त्रिभुवन, नितीन बनकर, उमेश त्रिभुवन, श्रीकृष्ण वेताळ, पंकज पटारे, दत्तात्रय बोरगे, धनंजय पवार, गणेश कोकणे, एकनाथ पटारे, वसतिगृह अधीक्षक सुरेश गलांडे आदी उपस्थित होते.

# चिंचबन येथे वनस्पती आरोग्य प्रदर्शनला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषी महाविद्यालय, सोनई येथील अंतिम वर्षातील कृषिदूत विद्यार्थ्यांकडून ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत चिंचबन येथे शेतकऱ्यांसाठी वनस्पती आरोग्य प्रदर्शन केंद्राचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला शेतकरी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वनस्पती आरोग्य प्रदर्शन केंद्रामध्ये शेतकऱ्यांना विविध पिकांवरील किडी व रोगांची ओळख, लक्षणे, कारणे तसेच त्यांचे एकात्मिक व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पिकांमध्ये नियमित निरीक्षण करून कीड व रोगांचे वेळीच निदान करणे आणि योग्य वेळी योग्य उपाययोजना करणे याचे महत्त्व कृषिदूतांनी स्पष्ट केले. या उपक्रमात कृषिदूत सोमेश्वर कोतकर, विजय गर्धे, अथर्व गोडसे, शेखर गायकवाड, राहुल गंगावणे व धनराज बांदल यांनी सक्रिय सहभाग घेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे,उपप्राचार्य प्रा.सुनील बोरुडे, प्रकल्प समन्वयक प्रा.अनूप दरंदले, प्लांट क्लिनिक समन्वयक प्रा . सचिन खाटीक,कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संतोष चौगुले, प्रा.नरेंद्र दहातोंडे, प्रा. दिशा चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.



# गरजूंना केलेल्या दानातूनच मिळते खरे पुण्य : स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** विवाह सोहळ्यातील डीजेचा दणदणाट आणि रस्त्यावर पडलेले सत्काराचे फेटे पाहून वाईट वाटते. समाजाला त्रासदायक ठरणाऱ्या खर्चाऐवजी गरजू ठिकाणी दान केले, तर त्यातून खरे पुण्य मिळते. आज संपत्तीची कमतरता नाही; मात्र समाजाला चांगल्या संस्कारांची गरज आहे, असे प्रतिपादन श्री क्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी केले. भेंडा येथील उद्योजक बापूसाहेब नजन यांनी कन्येच्या विवाह सोहळ्यातील अनावश्यक खर्चाला फाटा देत विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प केला होता. त्याअंतर्गत १११ वृक्षांची लागवड, 'मानस कन्या' अभियानांतर्गत पाच मुलींचे शैक्षणिक पालकत्व, नागेबाबा गोशाळेसाठी चारा, मंदिरांना देणगी, रुग्णांसाठी सुरू असलेल्या अन्नपूर्णा योजनेला आर्थिक मदत तसेच फर्निचर मॉलमधील कर्मचाऱ्यांचा प्रत्येकी १० लाख रुपयांचा अपघाती विमा काढण्याचा संकल्प करण्यात आला.शनिवारी (दि. ८) स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते या संकल्पाची पूर्तता करण्यात आली. यावेळी माजी आमदार पांडुरंग अभंग, अंकुश महाराज कादे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. डीजेबंदी ही काळाची गरज असून, त्यासाठी समाजाने एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहनही स्वामींनी केले.



# बेपत्ता ऋषिकेश गडाख दहाव्या दिवशी सापडला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** संगमनेर शहरातील गंगामाई घाट परिसरात प्रवरा नदीत पोहताना बेपत्ता झालेल्या ऋषिकेश नवनाथ गडाख (वय २५, रा. पारेगाव बुद्रुक, ता. संगमनेर) या तरुणाचा अखेर दहाव्या दिवशी धानोरे, ता. राहुरी येथील प्रवरा नदीपात्रात शोध लागला. नदीतील तीव्र प्रवाहामुळे वाहून आलेला मृतदेह धानोरे येथे आढळून आला असून, तो ऋषिकेश गडाख याचाच असल्याची प्राथमिक शंका व्यक्त करण्यात आली आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून, मृतदेहाची ओळख पटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

ऋषिकेश गडाख हा मित्रांसोबत संगमनेर येथील गंगामाई घाट परिसरात प्रवरा नदीत पोहण्यासाठी गेला होता. नदीला मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने प्रवाह वेगवान होता. पोहत असताना तो अचानक पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने बेपत्ता झाला. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने शोधमोहीम सुरू केली होती.

गेल्या दहा दिवसांपासून प्रवरा नदीपात्रात विविध ठिकाणी बोटी, ड्रोन आणि बचाव उपकरणांच्या साहाय्याने शोध घेण्यात येत होता. मात्र नदी दुथडी भरून वाहत असल्याने पाण्याचा वेग, वाढलेली खोली, धोकादायक वळणे, खोल खड्डे, दगड तसेच पाण्याखालील अडथळ्यांमुळे बचाव पथकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. प्रतिकूल परिस्थितीतही बचाव पथकांनी दिवस-रात्र शोधकार्य सुरू ठेवले.

अखेर दहाव्या दिवशी धानोरे येथील प्रवरा नदीपात्रात मृतदेह आढळून आला. नदीच्या तीव्र प्रवाहामुळे तो संगमनेरहून वाहत धानोरेपर्यंत आला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मृतदेह ऋषिकेश गडाख याचाच असल्याची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर ही माहिती स्थानिक प्रशासनाला देण्यात आली.

# 'गोदड महाराजांच्या जयघोषाने दुमदुमणार कर्जत !'

**मिरजगांव :** ग्रामदैवत श्री संत सद्गुरू गोदड महाराजांचा बहुप्रतीक्षित वार्षिक रथोत्सव ९ आणि १० ऑगस्ट रोजी भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात रंगणार आहे. कामिका एकादशीच्या पर्वावर भरणाऱ्या या ऐतिहासिक यात्रेसाठी कर्जत नगरी सजली असून, लाखो भाविकांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर ट्रस्ट, यात्रा समिती आणि प्रशासनाने जय्यत तयारी पूर्ण केली आहे.

रथोत्सवाच्या दोन दिवसांत कर्जत शहरात भक्तीचा गजर, रथाचा थरार, यात्रेची रंगत आणि कुस्तीच्या आखाड्याचा रोमांच अनुभवायला मिळणार आहे. ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता श्री गोदड महाराजांचा पारंपरिक लाकडी रथ मंदिरातून ग्रामप्रदक्षिणेसाठी मार्गस्थ होणार आहे. रथ बाहेर पडताच 'गोदड महाराजांचा विजय असो'च्या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमणार आहे.

रथ ओढण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होणार असून, शहरातील प्रमुख मार्गांवरून रथाची ग्रामप्रदक्षिणा होईल. मध्यरात्री नंतर रथ मंदिरात परतल्यानंतर भव्य महाआरतीने पहिल्या दिवसाची सांगता होणार आहे. रथोत्सवातील विशेष आकर्षण ठरणाऱ्या रात्रीच्या रथदर्शनासाठी प्रकाशव्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नगरपंचायत आणि महावितरणकडून यासाठी आवश्यक तयारी केली जात आहे. त्यामुळे प्रकाशझोतात सजलेला रथ आणि त्याभोवती जमलेला भक्तिसागर हा क्षण भाविकांसाठी अविस्मरणीय ठरणार आहे.

कर्जत बसस्थानक परिसर, ईदगाह मैदान तसेच दादा पाटील महाविद्यालयासमोरील प्रांगणात भव्य मनोरंजन नगरी उभारण्यात आली आहे. रहाट पाळणे, चकरी, आकाश पाळणा, मौत का कुआ, जादूचे खेळ, लहान मुलांसाठी विविध खेळणी आणि खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यामुळे यात्रेच्या उत्साहाला आणखी उधाण येणार आहे.

### १० ऑगस्टला आखाड्यात मल्लांची दंगल!

रथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी १० ऑगस्टला भव्य कुस्ती मैदान रंगणार आहे. कर्जत तालुक्यासह परजिल्ह्यांतील नामांकित मल्ल आखाड्यात उतरणार असून, एकापेक्षा एक चुरशीच्या निकाली कुस्त्यांमुळे कुस्तीप्रेमींना रोमांचक थरार अनुभवायला मिळणार आहे. विजयी मल्लांना रोख बिदागी देऊन गौरविण्यात येणार असून, कुस्तीच्या आखाड्याने यंदाच्या यात्रेची सांगता होणार आहे.

# गौतम बँकेसारखी दुसरी बँक महाराष्ट्रात नाही : आ. काळे

## गौतम सहकारी बँकेची ५१ वी सभा खेळीमेळीत




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** रिझर्व्ह बँक व शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन, पारदर्शक कर्जवाटप, प्रभावी कर्जवसुली आणि शिस्तबद्ध कारभाराच्या जोरावर गौतम सहकारी बँकेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सन २०२५-२६ अखेर बँकेच्या ठेवी १४८ कोटी रुपये होत्या. त्यात सातत्याने वाढ होऊन आजमितीस ठेवी १७५ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. एवढ्या ठेवींवर एवढा नफा कमावणारी गौतम सहकारी बँकेसारखी दुसरी बँक महाराष्ट्रात नाही, असे गौरवोद्गार आमदार आशुतोष काळे यांनी काढले.

गौतम सहकारी बँकेची सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गौतमनगर येथील बँकेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. बँकेचे मार्गदर्शक तथा माजी आमदार अशोकराव काळे आणि आमदार आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन संजय आगवण होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. काळे म्हणाले की, कर्मवीर शंकरराव काळे यांनी सहकाराची मुहूर्तमेढ रोवून उभ्या केलेल्या सहकारी संस्थांना प्रगतीपथावर नेण्याचे काम माजी आमदार अशोकराव काळे यांनी केले. आजही त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संस्था उत्तम पद्धतीने सुरू आहेत. गौतम बँकेची स्पर्धा खासगी बँकांशी असून, ग्राहकांना आधुनिक सेवा-सुविधा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमुड यांनी बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा अहवाल मांडला. आरबीआयचे नियम, वाढती स्पर्धा आणि आर्थिक आव्हानांचा सामना करत बँकेने भक्कम कामगिरी केली आहे. बँकेचा मिश्र व्यवसाय २०४ कोटींवरून २३८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. बँकेकडे १४८ कोटी रुपयांच्या ठेवी असून कर्ज येणे ८९ कोटी ५६ लाख रुपये आहे. बँकेला ४ कोटी १४ लाख ६ हजार रुपयांचा ढोबळ नफा, तर सर्व कायदेशीर तरतुदीनंतर १ कोटी ३५ लाख ४८ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला. मागील काही वर्षांपासून बँकेचा निव्वळ एनपीए शून्य टक्के असल्याचे त्यांनी सांगितले.

गौतम बँकेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, नाशिक, ठाणे, पुणे आणि संभाजीनगर जिल्ह्यांत असून नऊ शाखांच्या माध्यमातून विविध घटकांच्या आर्थिक गरजा पूर्ण केल्या जात आहेत. सभेत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये निधन झालेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे यांनी विषयपत्रिकेवरील १ ते १६ विषय सभेसमोर मांडले. सभासदांनी टाळ्यांच्या गजरात सर्व विषयांना एकमताने मंजुरी दिली. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष विजयराव रक्ताटे, संचालक मंडळ, व्यवस्थापन मंडळ सदस्य, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन वैभव महाजन यांनी केले, तर आभार चेअरमन संजय आगवण यांनी मानले.

# शिर्डीत विनापरवाना रिक्षांवर आरटीओचा बडगा

## नियम पाळा, अन्यथा कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शहरात विनापरवाना रिक्षा तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून, यापुढे नियमबाह्य रिक्षांना शहरात धावू दिले जाणार नाही, असा इशारा उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी दिला. कायद्यात राहाल तर फायद्यात राहाल, असे सांगत त्यांनी रिक्षाचालकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. शिर्डी हे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असल्याने देश-विदेशातून मोठ्या संख्येने साईभक्त येतात. त्यामुळे प्रवाशांना सुरक्षित व परवडणारा प्रवास मिळणे आवश्यक आहे. काही रिक्षाचालकांकडून मनमानी भाडेवसुली, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक आणि नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी आहेत. एका वृद्ध प्रवाशाला निर्जनस्थळी नेऊन ७ हजार २०० रुपयांची लूट झाल्याच्या घटनेनंतर प्रशासनाने अधिक कडक भूमिका घेतली आहे.

शेळके यांनी श्रीरामपूर आरटीओचे अधिकारी जोशी यांच्याशी संपर्क साधल्यानंतर आरटीओने शिर्डीतील विविध चौकांत तपासणी मोहीम राबविली. या कारवाईत शेकडो नियमबाह्य रिक्षांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश येसेकर यांच्या पथकानेही कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, फुटपाथ विक्रेत्यांसाठीही लवकरच नियमावली निश्चित करण्यात येणार असून, दोन दिवसांत निकष ठरवून विक्रेत्यांना जागा उपलब्ध करून देण्याचा आराखडा अंतिम केला जाईल, असे शेळके यांनी सांगितले.

# मंजिरी देशपांडे ३६ वर्षाच्या सेवेनंतर निवृत्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी एज्युकेशन सोसायटीचे लालाशेठ बिहाणी विद्या मंदिर प्रशालेतील उपमुख्याध्यापक मंजिरी सुनील देशपांडे ३६ वर्षाच्या सेवेतून निवृत्त झाल्या.या निमित्ताने शाळेत भावपूर्ण निरोप समारंभ झाला. विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास अनाप अध्यक्षस्थानी होते.प्रमुख पाहुणे म्हणून राहुरी एज्युकेशन संस्थेचे सचिव मनोज बिहाणी, नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे ,उपनगराध्यक्ष गजानन सातभाई ,सुनील देशपांडे व्यासपीठावर हजर होते.

अनिल देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. कविता शिंदे (रासकर ) निवृत्त मुख्याध्यापक सयाजी शिंदे ,संदीप रासकर मनीषा देशपांडे, सायली देशपांडे, परशुराम तमनर मुख्याध्यापक कैलास अनाप, मीनाक्षी पाठक ,रसिका वावीकर यांची यावेळी भाषणे झाली. सर्वांनी उपमुख्याध्यापक मंजिरी देशपांडे यांनी दिलेल्या सेवेबद्दल गौरवौद्गार काढले. संस्थेतर्फे सचिव मनोज बिहाणी, मुख्याध्यापक कैलास अनाप आदींनी पदक व सन्मानपत्र देवून सत्कार केला. विद्यामंदिर शिक्षक पतसंस्थेतर्फे आर एस जगताप,नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे ,बाबासाहेब गुंजाळ यांनी सत्कार केले. विविध संस्था व व्यक्ती यांच्या वतीने सत्कार करण्यात आले.सेवानिवृत्त शिक्षक संघटनेतर्फे प्रा.बळीराम खैरनार,नामदेव खराडे,पारस जैन,नानासाहेब गोडे,एस.एस.गोसावी यांनी सत्कार केले.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### शिरसगाव येथे क्रांतिवीर लहुजी साळवे फलकाचे अनावरण

**शिरसगाव** : शिरसगावचे लोकनेते गणेशराव मुदगुले (अध्यक्ष) यांच्या हस्ते हरेगाव रोड ऐस कॉर्नर येथे क्रांतिसुर्य लहुजी वस्ताद साळवे नगर फलक उद्घाटन समारोह संपन्न झाला. यावेळी श बाळासाहेब बागुल सुनिल म्हस्के कृष्णा बागुल व पोलिस अधिकारी ग्रामस्थ उपस्थित होते.

### शिष्यवृत्ती परीक्षेत मनस्वी कदम प्रथम



**सोनई** : नेवासा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या शाळेतील इयत्ता चौथीची विद्यार्थिनी मनस्वी महेश कदम हिने शिष्यवृत्ती परीक्षेत ८०. ६७ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकवला. मनस्वी कदम ही नेवासा येथील जिल्हा सहकारी बँकेचे कर्मचारी महेश कदम यांची कन्या आहे. जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या शाळेतील इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. नुजत इजाज खान पठाण ७६% (द्वितीय) तर रोशनी दीपक धोत्रे (तृतीय क्रमांक) ७२. ६७ टक्के गुण मिळवून यशस्वी झाले आहे या मुलींना वैशाली कुलट, वर्षा जगताप, यांचे मार्गदर्शन लाभले या यशाबद्दल तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक पत्रकार संघटनेचे विजय खंडागळे लेखापरीक्षक आर. एन.शिंदे,बँक इन्स्पेक्टर डी. एस. वाघ, यांनी अभिनंदन केले आहे.

### माझे विरोधात तक्रार का दिली ?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : सावळीविहिर फाटा परिसरातील एका हॉटेल व्यावसायिकाला पूर्वी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याचा राग मनात धरून हॉटेलमध्ये घुसून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. शिवीगाळ, धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी रमेश देवराम ढवळे (वय ४७, रा. सावळीविहीर, ता. राहाता) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ते सावळीविहीर फाटा येथे एस. व्ही. कॉर्नर नावाचे हॉटेल चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात दि. ३१ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास आरोपी साईनाथ दिलीप कुसळकर (रा. सावळीविहीर, ता. राहाता) हा मद्यधुंद अवस्थेत हॉटेलवर आला.

तू माझ्याविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार का दिली? पोलीस माझं काही वाकडं करू शकत नाहीत. तू इथे कसा राहतोस आणि हॉटेल कसं चालवतोस ते पाहतोच, अशी धमकी देत त्याने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करून मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी आरोपीने फिर्यादी तसेच त्यांच्या पत्नीचे हातपाय तोडण्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे

### कॉलेज साठी बस थांबा होण्यासाठी, आ. प्राजक्त तनपुरे यांचा पुढाकार

**राहुरी** : स्व. रामदास पा. धुमाळ कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय (राहुरी कॉलेज) येथे अहिल्यानगर डिव्हिजनच्या गाड्यांचा अधिकृत बसथांबा असल्याने ते थांबणे अपेक्षित आहे. मात्र एसटी बसेस थांबत नसल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक व प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतोय. तसेच राहुरी बसस्थानकातून काही वाहकांकडून राहुरी कॉलेजपर्यंत प्रवाशांना बसमध्ये घेण्यास नकार दिला जात असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर राहुरी कॉलेज येथे संबंधित अधिकारी, महाविद्यालय प्रशासन आणि विद्यार्थी-प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली.

विद्यार्थ्यांची गैरसोय तातडीने दूर करून राहुरी कॉलेज येथे सर्व बसेसना नियमित थांबा देण्याबाबत तसेच अधिकृत बस थांबा असा फलक सदर ठिकाणी लावणेबाबत स्पष्ट सूचना यावेळी केल्या. नियमित बसथांबा असतानाही बसेस न थांबविणाऱ्या चालक-वाहकांवर आवश्यक ती कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांना व प्रवाशांना सुरळीत बससेवा मिळावी, यासाठी संबंधितांना ठोस कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

# वळण परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## एकाच रात्री तीन घरे फोडली, लाखोंचे दागिने लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वळण गावात शुक्रवारी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी धुमाकूळ घालत तीन बंद घरे फोडली. यामध्ये संजय खुळे यांच्या घरातून सुमारे पाच तोळे सोन्याचे दागिने व ४० हजार रुपये रोख असा मुद्देमाल चोरीला गेला असून, एकूण चोरीचा आकडा सुमारे सात लाख रुपये असल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे वळण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वळण येथील पाथरे रोड परिसरात संजय खुळे यांचे कुटुंबीय शेजारील खोलीत झोपलेले असताना चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडले.

घरातील सामानाची उचकापाचक करून पेटीत ठेवलेले अंदाजे पाच तोळे सोन्याचे दागिने आणि ४० हजार रुपये रोख रक्कम चोरून नेली. चोरी केल्यानंतर चोरट्यांनी पेटी शेजारील शेतात नेऊन फोडली. त्यातील सोने व रोख रक्कम घेऊन चोरट्यांनी पोबारा केला, तर पितळी भांडी घटनास्थळीच सोडून दिली. दरम्यान, घरातील देवघरातील रुख्मिणीच्या मूर्तीच्या गळ्यातील दागिन्यांना चोरट्यांनी हात लावला नसल्याचेही आढळून आले यानंतर चोरट्यांनी संजय खुळे यांच्या शेजारी राहणाऱ्या नानासाहेब खुळे यांच्या घराचेही कुलूप तोडून कपाटाची उचकापाचक केली.

> वळण परिसरात पहाटेच्या सुमारास सलग तीन घरे फोडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरातील पोलिसांची गस्त वाढवून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

मात्र कपाटातील दागिने बनावट असल्याचे लक्षात आल्यानंतर चोरट्यांनी तेथे चोरी केली नाही. त्यानंतर मांजरी रोड परिसरातील प्रभाकर आढाव यांच्या बंद घराचेही कुलूप तोडण्यात आले. चोरट्यांनी घरातील सामानाची उचकापाचक केली; मात्र त्यांच्या हाती कोणताही मुद्देमाल लागला नाही घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून श्वानपथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण केले. 'सीमा' या श्वानाच्या मदतीने चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे.

## संगमनेरच्या अत्याधुनिक पोलीस स्टेशनच्या कामाला गती

### आ. खताळ यांनी घेतला आढावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**संगमनेर** : शहरातील वाढती लोकसंख्या आणि कायदा-सुव्यवस्थेच्या गरजा लक्षात घेऊन संगमनेरमध्ये उभारण्यात येत असलेल्या अद्ययावत पोलीस स्टेशन व पोलीस अधिकारी-कर्मचारी निवासस्थानांच्या प्रकल्पाला आता गती मिळाली आहे. आमदार अमोल खताळ यांनी संबंधित सल्लागार व अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या. गृहनिर्माण विभागांतर्गत सुरू असलेल्या या प्रकल्पासाठी मे. जाजू असोसिएट्स, संगमनेर यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रकल्पाची गुणवत्ता, कामाची गती, नियोजन तसेच विविध कामांची सद्यस्थिती याबाबत आमदार खताळ यांनी संबंधितांशी चर्चा केली. संगमनेर बसस्थानकाच्या मागील बाजूस जुन्या पोलीस वसाहतीच्या जागेवर तीन मजली अत्याधुनिक पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उभारण्यात येत आहे. यासोबतच अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज निवासस्थानांचीही निर्मिती केली जाणार आहे. प्रकल्पात कर्मचाऱ्यांसाठी १००० चौरस फुटांचे २४ व ८४० चौरस फुटांचे २४, तर अधिकाऱ्यांसाठी १४५० चौरस फुटांचे ११ फ्लॅट उभारले जाणार आहेत. उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांसाठी २२०० चौरस फुटांचा प्रशस्त बंगला, अंतर्गत डांबरी रस्ते, पार्किंग व संरक्षक भिंत आदी सुविधांचाही समावेश आहे. हा प्रकल्प यापूर्वी रखडला होता. मात्र आमदार खताळ यांनी विधानसभेत विषय मांडून सातत्याने पाठपुरावा केल्याने कामाला पुन्हा गती मिळाली आहे. या प्रकल्पामुळे पोलीस यंत्रणेला आधुनिक सुविधा मिळून शहरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकल्पासाठी शासनस्तरावर सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल आमदार खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्यमंत्री योगेश कदम यांचे आभार मानले.

## शिष्यवृत्ती परीक्षेत पाथरेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा दबदबा

### जिल्हा गुणवत्ता यादीत सहा विद्यार्थ्यांची निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**झरेकाठी** : हिरक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये घवघवीत यश संपादन केले. जिल्हा गुणवत्ता यादीत विद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांनी स्थान मिळवत विद्यालयाच्या शैक्षणिक लौकिकात भर घातली आहे. इयत्ता चौथीच्या परीक्षेत १६ पैकी आठ विद्यार्थी पात्र ठरले असून ५० टक्के निकाल लागला. इयत्ता पाचवीत २८ पैकी १९ विद्यार्थी पात्र ठरले. इयत्ता सातवीत २५ पैकी २४ विद्यार्थी पात्र ठरून तब्बल ९६ टक्के निकाल नोंदविला. तसेच १७ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळविले असून इयत्ता आठवीचा निकाल १०० टक्के लागला.

जिल्हा गुणवत्ता यादीत यज्ञा एकनाथ शिरसाठ (२३२), अर्पित उमाकांत कडू (२२२), चैतन्य श्रीकांत अव्हाड (२२०), अथर्व सुरेश घोलप (२१२), प्रतिक्षा मच्छिंद्र जेजूरकर (२१२) आणि आर्यन भारत चित्ते (२१०) यांनी स्थान मिळविले. हे सर्व विद्यार्थी छचचड परीक्षेतही पात्र ठरले आहेत.

विद्यालयात डढएच् आधारित अध्यापन, विज्ञान-गणित प्रदर्शन व विविध नवोपक्रम राबविले जातात. मुख्याध्यापक के. बी. बारगुजे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या परिश्रमातून हे यश मिळाले. या यशाबद्दल संस्था पदाधिकाऱ्यांसह शिक्षणप्रेमींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शेतमालाच्या भावाला कायदेशीर संरक्षण आवश्यक : डॉ. अशोक ढगे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : कृषी शास्त्रज्ञ डॉ.अशोक ढगे यांच्या प्रमुख उपस्थितीत नेवासा तालुक्यातील खुपटी येथे आयोजित शेतकरी मेळाव्याला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेतमालाच्या भावाला कायदेशीर संरक्षण आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. ढगे यांनी यावेळी बोलताना केले. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश काका कारले हे होते.यावेळी युवा सरपंच गोरक्षनाथ तनपुरे यांनी आलेल्या शेतकऱ्यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

माजी कुलगुरू डॉ अशोकराव ढगे यांनी शेतकऱ्याच्या आत्महत्या बद्दल दुःख व्यक्त करून शेत मालाला हमीभावाचे कायदेशीर संरक्षण अत्यावश्यक झाल्याचे प्रतिपादन केले. डॉ रमेश हापसे यांनी ऊस उत्पादन वाढीच्या संदर्भात अनेक मुद्दे विशद केले. बेण्याची निवड पाणी व्यवस्थापन खतांचा संतुलित वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. तर डॉ. डी बी ताकटे यांनी जिवाणू खतांचे महत्त्व व विविध पिकांसाठी उपयुक्तता यावर माहिती दिली. जमिनीतील जिवाणूंची संख्या कमी होत असून त्यासाठी प्रत्येक पिकाला जिवाणू खत वापरावीत ती हाताळण्यास सोपी स्वस्त असून त्याची जमिनीच्या आरोग्यासाठी गरज निर्माण झाली आहे. खुपटी गावचे उपसरपंच किशोर कुऱ्हे, सोसायटीचे चेअरमन प्रकाश कारले,व्हाईस चेअरमन सुनील गव्हाणे, तंटामुक्ती अध्यक्ष गोवर्धन गव्हाणे, सोमनाथ काळे, कृषी अधिकारी शेळके पाटील,गोणेगावचे माजी सरपंच प्रकाश रोडे,सोपानराव शिंदे,भाऊसाहेब चौधरी,जगदीश चौधरी यांनी शेतीच्या संदर्भातील अनेक प्रश्न विचारून चर्चेत सहभाग घेतला.

शेतमालाचे अर्थशास्त्र, ऊस उत्पादन वाढीचे तंत्र व मंत्र तसेच जिवाणू खतांचा निर्णायक वापर यावर वैचारिक सखोल चर्चा झाली. सर्वांचे आभार प्रदर्शन प्रवीण कुऱ्हे यांनी केले

## महिलांनी शेतीपूरक उद्योगातून आर्थिक स्वावलंबी व्हावे : शैलेश देशमुख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लोणी** : शेती आणि शेतीपूरक व्यवसायाच्या माध्यमातून महिलांसाठी उद्योग उभारणीच्या मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेतून उद्योग उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध होत असून, महिलांनी या संधीचा लाभ घेऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, असे आवाहन महाबळेश्वर कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले.

बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्रात प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत आयोजित बीज भांडवल प्रशिक्षण कार्यक्रमात देशमुख बोलत होते बोलत होते.

संस्थेचे अध्यक्ष तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम आणि सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमास केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. विलास घुले, डॉ. विठ्ठल विखे, डॉ. प्रियंका खर्डे, संज्जला लांडगे, कैलास लोंढे, आदींसह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

देशमुख म्हणाले, अहिल्यानगर जिल्ह्यात महिला बचत गटांच्या माध्यमातून अनेक महिला विविध शेतीपूरक व्यवसायांकडे वळत आहेत. अन्नप्रक्रिया, कृषीमाल प्रक्रिया आणि मूल्यवर्धनाच्या माध्यमातून महिलांना स्वतःचा उद्योग उभारण्याची संधी आहे. यावेळी संज्जला लांडगे यांनी महिला बचत गट तसेच शेतीपूरक व्यवसायातून सुरू करता येणाऱ्या विविध प्रक्रिया उद्योगांची माहिती दिली.

उद्योग उभारणीच्या संपूर्ण प्रक्रियेत बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्र महिलांच्या पाठीशी राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ, अधिकारी आणि प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या. डॉ. प्रियंका खर्डे यांनी सूत्रसंचालन केले.

# प्रतीपंढरी ताहाराबाद सजले

## पांडुरंग महोत्सवाला प्रारंभ

**कमलेश विधाटे । राष्ट्र सह्याद्री**




**म्हैसगाव** : तालुक्यातील प्रतीपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र ताहाराबाद येथे संत कवी महिपती महाराज समाधी मंदिर परिसरात पांडुरंग महोत्सवाची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. शुक्रवार (दि.७) ते गुरुवार (दि.१३) ऑगस्टदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, राज्यभरातून लाखो भाविक ताहाराबाद येथे दाखल होणार आहेत.

आषाढ वद्य नवमीला पंढरपूरहून पांडुरंगाचे ताहाराबाद येथे आगमन होण्याची परंपरा आहे. शनिवारी (दि.८) महाभिषेक, काकड आरती, नैवेद्य, हरिपाठ व दिंड्यांचे स्वागत होणार आहे. रविवारी (दि.९) कामिका एकादशीच्या पर्वणीला विविध दिंड्या व पालख्यांचे आगमन होईल. यावेळी महाभिषेक, कीर्तन, ग्रामप्रदक्षिणा व हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवारी (दि.१०) रामदास महाराज क्षीरसागर व आदिनाथ महाराज शास्त्री यांची कीर्तनसेवा होईल. मंगळवारी (दि.११) काल्याचे कीर्तन व दुपारी देवस्थानचे मठाधिपती अर्जुन महाराज तनपुरे यांचे कीर्तन होऊन दहीहंडीचा कार्यक्रम होणार आहे. बुधवारी छबिना मिरवणूक व गोपाळकाला, तर गुरुवारी (दि.१३) पहाटे पाऊलघडीच्या कार्यक्रमाने महोत्सवाची सांगता होईल.

महोत्सवादरम्यान सात दिवस अन्नदान, चहा-नाष्ट्याची व्यवस्था करण्यात आली असून सुमारे आठ लाख भाविक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. भाविकांच्या सुविधेसाठी देवस्थान, ग्रामपंचायत व प्रशासनाने स्वच्छता, विद्युत रोषणाई, पाणी, आरोग्य, वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेची तयारी केली आहे. महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थान पदाधिकारी व ग्रामस्थांनी केले आहे.

## खेळामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील कामगिरीलाही चालना : गौरव डेंगळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर** : शिक्षणासोबत क्रीडेलाही समान महत्त्व दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. खेळामुळे शिस्त, वेळेचे नियोजन, नेतृत्वगुण, संघभावना, आत्मविश्वास व निर्णयक्षमता विकसित होत असून त्याचा सकारात्मक परिणाम शैक्षणिक प्रगतीवरही होतो, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय व्हॉलीबॉल प्रशिक्षक गौरव अरविंद डेंगळे यांनी केले. डी पॉल इंग्लिश मीडियम स्कूल येथे सहशालेय उपक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डिजिटल युगात विद्यार्थ्यांचा मोबाईल, ऑनलाइन गेम्स व सोशल मीडियावर खर्च होणारा वेळ कमी करून त्यांना दररोज एक-दोन तास मैदानावर खेळण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी पालकांना केले. केवळ अभ्यासातच नव्हे तर क्रीडा, कला, सांस्कृतिक व अन्य सहशालेय उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहन व सन्मान मिळणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये दडलेले कौशल्य ओळखून योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही शाळा, शिक्षक व पालकांची संयुक्त जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी विविध स्पर्धांतील गुणवंत विद्यार्थी तसेच नव्याने नियुक्त क्रीडा प्रशिक्षकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास फादर फ्रांको, प्रिन्सिपल सिस्टर ब्लेसा, रवी लोंढे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## उक्कलगाव सोसायटीच्या संचालकपदी रविंद्र थोरात, वैशाली थोरात बिनविरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण कर्जदार प्रतिनिधी प्रवर्गातील दोन रिक्त जागांसाठी झालेल्या निवड प्रक्रियेत रविंद्र विश्वनाथ थोरात आणि वैशाली वसंतराव थोरात यांची बिनविरोध निवड झाली. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या ३० जुलै २०२६ रोजीच्या आदेशानुसार या निवड प्रक्रियेसाठी प्राधिकृत अध्यासी अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक कार्यालयाचे निरीक्षक रविंद्र जाधव यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि.७) संस्थेच्या कार्यालयात निवड प्रक्रिया पार पडली.

निवडणूक कार्यक्रमानुसार अर्ज वाटप, छाननी व माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन्ही जागांसाठी प्रत्येकी एकच अर्ज शिल्लक राहिला. त्यामुळे रविंद्र थोरात व वैशाली थोरात यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाधव यांनी अधिकृतरीत्या जाहीर केले. निवडीनंतर सोसायटीच्या सभागृहात नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोसायटीचे उपाध्यक्ष शरद थोरात, माजी उपसरपंच विकास थोरात, इंद्रनाथ थोरात, देवस्थानचे अध्यक्ष उल्हास महाराज तांबे यांच्यासह पदाधिकारी, संचालक, ग्रामस्थ व कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन विकास थोरात यांनी केले.

# पान १ वरुन

पान १ वरुन

### २४ वर्षांनंतर आरबीआयची 'नागरी'ला दारे खुली!

नव्या बँकेसाठी आलेल्या अर्जांची आरबीआयकडून प्रथम प्राथमिक छाननी करण्यात येईल. त्यानंतर पात्र अर्जदार संस्थांची सखोल आर्थिक तपासणी व पडताळणी केली जाणार आहे. रिझर्व्ह बँकेची अंतर्गत छाननी समिती अर्जांचे परीक्षण करून त्याबाबत शिफारस करेल. त्यानंतर केंद्रीय संचालक मंडळाची समिती अंतिम निर्णय घेणार आहे.त्यामुळे नव्या नागरी सहकारी बँकांना परवाना देण्याची प्रक्रिया काटेकोर आणि बहुस्तरीय राहणार आहे. दरम्यान, नव्या नागरी सहकारी बँकांसाठी असलेली १० हजार कोटी रुपयांच्या ठेवींची किमान अट कमी करून ती एक हजार कोटी रुपये करण्यात यावी, अशी मागणीही जुगादे यांनी केली आहे. ही अट कमी झाल्यास महाराष्ट्रासह सहकार क्षेत्रात भक्कम पाया असलेल्या अनेक राज्यांतील सक्षम पतसंस्थांना नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रात प्रवेशाची संधी मिळू शकते.या निर्णयामागे केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचेही जुगादे यांनी नमूद केले. एकीकडे निर्बंधांमुळे अनेक नागरी सहकारी बँकांच्या ठेवीदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला; तर दुसरीकडे आता नव्या नागरी सहकारी बँकांना परवानगी देण्याचा निर्णय घेऊन आरबीआयने सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी नवे दालन खुले केले आहे. त्यामुळे 'निर्बंधांच्या सावटातून नव्या पर्वाकडे' असा सहकारी बँकिंग क्षेत्राचा प्रवास सुरू झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

### भारतात रोजगाराचे सर्व मार्ग बंद : राहुल गांधी

भारताकडे युवक आहेत आणि त्यांच्याकडे सर्वाधिक डेटा आहेत. तुमच्या डेटाशिवाय एआयला काही अर्थ नाही, असं त्यांनी म्हटलं. इंजिनिअरिंग, मेडिकल शिक्षणासाठी पैसे खर्च केले जातात. मात्र, या प्रमाणपत्रांचा कोणताही अर्थ नाही. कारण ही प्रमाणपत्र तुम्हाला रोजगार देऊ शकत नाहीत. मीडिया प्रत्येक ठिकाणी एआयची चर्चा होते. प्रत्येक जण याबाबत चर्चा करतोय. मात्र, मला स्पष्ट करायचंय की आपल्या डेटाशिवाय एआयला काही अर्थ नाही. एआय आपल्या डेटावरच बनलं आहे, असं राहुल गांधी यांनी म्हटलं.

### कॉकरोच जनता पार्टीविरोधात दोन तरुणांचे उपोषण

केवळ निवडक दहा-बारा जणांचीच टीम तयार करण्यात आल्याचा आरोप मनीष ब्रह्मभट आणि राहुल पांड्या यांनी केला.माध्यमांशी बोलताना आंदोलकांनी सांगितले की, हे आंदोलन कोणत्याही एका व्यक्तीचे नसून देशातील तरुणांचे आंदोलन आहे. त्यामुळे देशभरातून आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या तरुणांना त्यात सहभागी करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. नेतृत्वाच्या निवड प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचाही आरोप त्यांनी केला.उगझच्या कमिटीमध्ये जवळच्या मित्रपरिवारातील तसेच राजकीय पार्श्वभूमी असलेल्या काही व्यक्तींना स्थान दिले जात असल्याचा दावा आंदोलकांनी केला. तसेच, काही व्यक्तींना त्यांच्या वैयक्तिक संबंधांच्या आधारे महत्त्वाची जबाबदारी दिल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र, या आरोपांची स्वतंत्र पुष्टी झालेली नाही.दरम्यान, आंदोलनाचा तिसरा दिवस सुरू असून, आपल्या मागण्यांवर ठोस निर्णय होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याची भूमिका मनीष ब्रह्मभट आणि राहुल पांड्या यांनी घेतली आहे. त्यांच्या आरोपांबाबत उगझचे नेतृत्व आणि अभिजीत दिपके यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

### युनूस शेखला तीन दिवसांची पोलीस कोठडी

वैभव कुलबर्ग यांच्यासह विविध पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या. दरम्यान, आमदार संग्राम जगताप यांनी रुग्णालयात जाऊन जखमी परदेशी यांची विचारपूस केली. विधानसभेचे सभापती राम शिंदे यांनीही रुग्णालयात भेट देऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली.या घटनेच्या निषेधार्थ महापालिका कर्मचारी युनियनने बैठक घेऊन आरोपींना २४ तासांत अटक करण्याची मागणी केली आहे. अन्यथा मुकुंदनगर परिसरात महापालिकेचा एकही कर्मचारी काम करणार नाही आणि परिसरातील महापालिकेच्या सेवा-सुविधा बंद करण्याचा इशारा युनियनने दिला आहे. कर्मचारी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांनी महापालिका कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांना कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सरपंच शितलताई पटारे यांचे ना. विखे यांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान |** भोकरच्या सरपंच शितलताई पटारे यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह विविध प्रलंबित प्रश्नांबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना लेखी निवेदन सादर करून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

निवेदनात महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील कालावधीमुळे आडसाली ऊस उत्पादक शेतकरी वंचित राहत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. १ ऑक्टोबर २०१८ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीत घेतलेल्या पीक कर्जाचा दोन्ही योजनांमध्ये समावेश होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा कालावधी १ ऑक्टोबर २०१८ पासून लागू करावा, जेणेकरून वंचित शेतकऱ्यांना न्याय मिळेल, अशी मागणी त्यांनी केली. तसेच रब्बी हंगामातील पिकांच्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करून अनुदानाची रक्कम लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशीही मागणी करण्यात आली. यावेळी काकासाहेब पटारे, राहुल अभंग व ग्रामस्थ उपस्थित होते.



### वैजापूरचा डंका ऑस्ट्रेलियात

## प्रियंका राजपूत टीचर ऑफ द इयरने सन्मानित



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** :येथील प्रियंका राजपूत या ऑस्ट्रेलियामधील पर्थ या शहरांमध्ये वास्तव्य करतात त्यांचे पती सुरज राजपूत हे पर्थ येथील शासकीय सेवेत रुजू आहेत तसेच प्रियंका राजपूत सुद्धा 'पाठशाला हिंदी समुदाय' या शाळेत हिंदी शिकवतात तसेच भारतीय संस्कृतीचा प्रचार व प्रसार या शाळेच्या माध्यमातून केला जातो दरवर्षी या शाळेमार्फत शिक्षकाला उत्कृष्ट शिक्षक हा पुरस्कार दिला जातो यावर्षी चा प्रियंका राजपूत यांना टीचर ऑफ द इयर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला याप्रसंगी आ. रमेश पाटील बोरणारे नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, मर्चंट बँकेचे चेअरमन बाळासाहेब संचेती, काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. नितेश शहा वैजापूरच्या मा. नगराध्यक्षा शिल्पा परदेशी ,नगरसेविका संगीता राजपूत ,जयश्री राजपूत, सविता चव्हाण, तसेच संतोषी भालेराव, वर्षा राजपूत ,सुरक्षा ठाकरे, करिश्मा राजपूत, धनश्री राजपूत, दिपाली राजपूत, या सह वैजापूर वासियांनी अभिनंदन केले.

## साळी समाजाच्यावतीने विणकर दिन साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** विणकर दिनानिमित्त साळी समाजाचे आद्य दैवत व वस्त्र निर्माते भगवान जिव्हेश्वर यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून वैजापूर येथील साळी समाज बांधवांनी विणकर दिन साजरा केला. वैजापूर येथील



विठ्ठल रुक्मिणी मंदिर व भगवान जिव्हेश्वर मंदिर येथे साळी समाज बांधवांच्या वतीने विणकर दिन निमित्त समाजाचे जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षक अशोकराव धसे गुरुजी यांनी दिनकर दिनाचे महत्त्व व त्याबद्दल सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. याप्रसंगी सेवानिवृत्त आदर्श शिक्षक अशोक मांजरे, सेवानिवृत्त शिक्षक अशोक धसे, साळी समाज अध्यक्ष समीर लोंढे, अविनाश कळंके, सुनील गुळसकर, किशोर आहीरे. विलास रामैया, ध्रुवाशेठ गुळसकर , राहुल सरोदे, आशिष सरोदे लक्ष्मीकांत कांबळे, माणिक सातपुते,गणेश कांबळे, महेश अहिरे , रोशन धसे, चंद्रकला मांजरे, कांबळे आजी यांच्यासह भजनी मंडळ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सुरज नाईकवाडी यांची परिविक्षाधीन मुख्याधिकारीपदी नियुक्ती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** तीर्थक्षेत्र शिर्डीच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या शिर्डी नगरपरिषदेच्या परिविक्षाधीन मुख्याधिकारी पदावर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून श्री. सुरज नाईकवाडी (मुख्याधिकारी, गट-ब) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या आशयाचा शासन निर्णय नुकताच संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे .शासनाच्या आदेशानंतर शिर्डीच्या प्रशासकीय वर्तुळात समाधानाचे वातावरण आहे. मागील काही काळापासून शिर्डी नगरपरिषदेचा पदभार मुख्याधिकारी सतिश दिघे यांच्याकडे आहे . सरकारने नव्याने नियुक्त केलेल्या मुख्याधिकारी पदाच्या उमेदवारांना ट्रेनिंग देण्यासाठी विविध महापालिका व नगर परिषद मधे मुख्याधिकाऱ्यांच्या हाताखाली प्रशासकीय कामाची ओळख करून घेण्यासाठी सदर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत . श्री नाईकवाडी यांच्या येण्याने मुख्याधिकारी दिघे यांचे कामाचा ताण हलका होणार असल्याने त्यांना मदत होणार आहे .

## श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. माने, पर्यवेक्षकपदी प्रा. रोडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** मुळा एज्युकेशन सोसायटीच्या नेवासे येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा. हरिश्चंद्र माने तर पर्यवेक्षकपदी प्रा गोवर्धन रोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नेवासा येथील ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या उपप्राचार्य राधाताई मोटे या सेवानिवृत्त झाल्याने रिक्त असलेल्या या पदावर नेवासे तालुका जुनी पेन्शन ग्रस्त संघटने नेते प्रा हरिचंद्र मोहन माने तर पर्यवेक्षकपदी अहिल्यानगर जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन संघटनेचे जिल्हा कार्यकारणी सदस्य व नेवासे तालुका अध्यक्ष प्रा गोवर्धन मच्छिंद्र रोडे यांची नियुक्ती करण्यात आली. प्रा हरिश्चंद्र माने यांना भौतिक विषयाचे अध्यापनाचा २८ अनुभव आहे तर प्रा गोवर्धन रोडे यांना एकूण ३० वर्ष अध्यापनाचा अनुभव आहे.

उपप्राचार्य प्रा हरिचंद्र माने तर पर्यवेक्षक प्रा गोवर्धन रोडे यांचे संस्थेचे मार्गदर्शक माजी मंत्री शंकरराव गडाख, उपाध्यक्ष उदयन गडाख, सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ विनायक देशमुख, सोनई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गोरक्षनाथ कल्हापुरे आदींनी अभिनंदन केले. तर त्यांचा शिक्षक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा अजय पवार, प्रा भगवंत विरकर, प्रा सुभाष सोनवणे, प्रा.रामभाऊ पवार , प्रा.सुर्यकांत बर्डे, प्रा.सुनील गर्जे, प्रा पाटील तुवर ,प्रा संजय घावटे, प्रा हरिष पंडीत, प्रा मयूर जामदार ,प्रा.सुरेश होले ,प्रा.कविता जाधव ' प्रा.नितीन खरात ,प्रा. ज्योती भोगे ,प्रा. सुकन्या फाटके, प्रा मुकुंद खर्डे, प्रा किरण कदम, प्रा.सुजय नवले, अझर शेख, भाऊसाहेब चक्रनारायण, शुभम वाकचौरे आदी उपस्थित होते.



## शिर्डीत १३ ऑगस्टपासून साई चरित्र ग्रंथ पारायण सोहळा

### २० ऑगस्टला भव्य मिरवणूक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शिर्डी नाट्य रसिक मंच, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री साई चरित्र ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार (दि.१३) ते गुरुवार (दि.२०) ऑगस्टदरम्यान भक्तनिवास येथील साई आश्रम फेज-१ येथे हा सोहळा भक्तिभावात होणार आहे. पुरुषांसाठी सकाळी ७ ते ११.३०, तर महिलांसाठी दुपारी १ ते ५ या वेळेत पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. मागील वर्षी साडेपाच हजार महिलांसह अडीच हजार पुरुषांनी सहभाग घेतला होता. यंदा त्यापेक्षा अधिक भाविक सहभागी होण्याची अपेक्षा असून, समितीने तयारी पूर्ण केली आहे. पारायणासाठी येणाऱ्या भाविकांनी ग्रंथ, श्रीफळ व बसण्यासाठी बस्कर सोबत आणावे. अखंड वीणा सेवेसाठी इच्छुकांनी नावे नोंदवावीत, असे आवाहन अध्यक्ष अशोक नागरे, सचिव अशोकराव कोते व कार्याध्यक्ष रमेश गोंदकर यांनी केले आहे. २० ऑगस्टला सायंकाळी गावातून ग्रंथाची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, २१ ऑगस्टला काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

## शिर्डीत अत्याधुनिक शवदाहिनी

### अखेरच्या प्रवासालाही मिळणार सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी |** साईनगरी शिर्डीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी नगरपरिषदेने ८२ लाख रुपये खर्चून तीन अत्याधुनिक शवदाहिनी व आवश्यक सुविधा उभारण्याचे काम हाती घेतले असून हे काम अंतिम टप्प्यात आले आहे. या प्रकल्पामुळे मृतांच्या अंत्यसंस्कारासाठी होणारी प्रतीक्षा कमी होऊन अखेरच्या प्रवासालाही सन्मान मिळणार आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, नगराध्यक्ष जयश्री थोरात आणि मुख्याधिकारी सतीश दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटन विकास निधीतून हा प्रकल्प साकारला जात आहे. शिर्डीची वाढती लोकसंख्या, साईभक्तांची वर्दळ आणि उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमुळे अंत्यसंस्कारासाठी उपलब्ध असलेल्या दोनच शवदाहिनी अपुऱ्या पडत होत्या. त्यामुळे अनेक कुटुंबांना उन्हात-पावसात तासन्तास प्रतीक्षा करावी लागत होती. ही समस्या लक्षात घेऊन नगरपरिषदेने तीन आधुनिक व पर्यावरणपूरक शवदाहिनींसह पक्के काँक्रीटीकरण, संरक्षक शेड, अंतर्गत रस्ते, वृक्षारोपण, सुशोभीकरण आणि संरक्षण भिंत उभारण्याची कामे सुरू केली आहेत. उपनगराध्यक्ष अभय शेळके म्हणाले, ''माणसाचा शेवटचा प्रवास सन्मानाने व्हावा, हीच आमची भूमिका आहे. या सुविधेमुळे अंत्यविधीसाठी होणारी प्रतीक्षा संपुष्टात येईल आणि प्रत्येक कुटुंबाला आपल्या प्रिय व्यक्तीला वेळेत व सन्मानाने अखेरचा निरोप देता येईल.'' या प्रकल्पामुळे शिर्डी व परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून नगरपरिषदेच्या विकासाभिमुख उपक्रमाचे सर्वत्र स्वागत

## शेतकरी संघटनेच्या पाठपुराव्याला यश

### रब्बी अवकाळी अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान |** मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या रब्बी पिकांच्या अनुदानासाठी शेतकरी संघटनेने आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर प्रशासनाने दखल घेत संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



४ ऑगस्ट रोजी शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष व विधिज्ञ ॲड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली नेवासा तहसील कार्यालयात तहसीलदार संजय बिराजदार यांची भेट घेऊन कांदा, गहू आणि हरभरा पिकांच्या नुकसानीबाबतचे अनुदान तातडीने वितरित करण्याची मागणी करण्यात आली होती. पंचनामे पूर्ण होऊनही अनुदान मिळत नसल्याची बाब संघटनेने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली.

तहसीलदारांनी तातडीने दखल घेत संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याचे आदेश दिल्यानंतर रक्कम वितरित होण्यास सुरुवात झाली. यामुळे शेतकऱ्यांनी तहसील प्रशासनासह शेतकरी संघटनेचे आभार व्यक्त केले.

यावेळी नेवासा तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मेजर अशोक काळे, प्रा. कार्लस साठे, हरी तूवर, बाबासाहेब नागोडे, रोहित कुलकर्णी, बंडोपंत चौगुले, किरण लंघे, बापूसाहेब देशमुख, दिलीप पोटे, गणेश गोरे, विजय गायकवाड, ॲड. बाळासाहेब कावळे, ज्ञानेश्वर शिरसाठ आदी पदाधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून अनुदान मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याचे सांगण्यात आले.

## निधन वार्ता

### केशरबाई मुठे



**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव येथील गं. भा. केशरबाई सारंगधर मुठे यांचे वयाचे १०४ व्यावर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. मुठेवाडगांव सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन पद त्यांनी भुषविले होते.त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार असून मुठेवाडगाव तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष सोपानराव मुठे, प्रगतशील शेतकरी विष्णुपंत व निवृत्ती मुठे यांच्या मातोश्री होत.

### साहेबराव साळवे



**राशीन :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) राशीन शहराध्यक्ष नितीन साळवे यांचे वडील तथा राशीन गावचे माजी उपसरपंच साहेबराव रामचंद्र साळवे यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### बळवंता तांबे



**बोधेगाव :** येथील रहिवासी आणि जुन्या पिढीतील ज्येष्ठ नागरिक बळवंता गंगाराम तांबे (वय ९३) यांचे शनिवारी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक विवाहित मुलगी, भाऊ, पुतणे, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. बोधेगाव विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन विठ्ठलराव तांबे यांचे ज्येष्ठ बंधू, प्राथ. शिक्षक बाबासाहेब तांबे यांचे चुलते तसेच शहरटाकळी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. रामेश्वर तांबे, माध्य. शिक्षक संजय तांबे, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद तांबे व ॲड. संकेत तांबे यांचे ते आजोबा होत.

### भागवत चव्हाण



**राहुरी :** येथील भागवत बापू चव्हाण, (वय ७५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा, दोन मुली, सुन ,नातवंडे असा परिवार असून नगर एमआयडीसी येथील जी के एन सेंटर मेटल्स या कंपनीत कार्यरत असलेले प्रदीप चव्हाण यांचे ते वडील होत.

### बाळासाहेब धसाळ



**राहुरी:** तालुक्यातील आरडगांव येथील प्रगतिशील शेतकरी बाळासाहेब रावजी धसाळ (वय ७९) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःख निधन झाले. त्यांनी आरडगाव सोसायटीचे चेअरमन म्हणून काम पाहिले. ॲड. डी.वाय. वने पाटील पतसंस्थेचे संचालक म्हणून काम पहात होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन बंधू, दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडं असा मोठा परिवार आहे.


**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME ABDUL MAJID GULAM MOHAMMED SAYYED (OLD PASSPORT) (BEFORE NAME) TO NEW NAME AS MAJID GULAMMAHMAD SAYYADJAHAGIRDAR (AADHAR CARD NO.8597 4570 8642) (AFTER NAME) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON PLACE - KOPARGAON DATE- 08/08/2026


### १४ ऑगस्टला शिर्डीत मोफत बाल हृदयरोग तपासणी शिबिर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** बालकांमधील जन्मजात तसेच इतर हृदयरोगांचे वेळेत निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी आणि माईर्स विश्वराज हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे मोफत बाल हृदयरोग तपासणी व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

शिबिरात बालहृदयरोग तज्ञ डॉ. आशीषकुमार बनपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत वैद्यकीय सल्ला, टूडी इको तपासणी व आवश्यक वैद्यकीय तपासण्यांबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. पात्र रुग्णांना मोफत बालहृदय शस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

वारंवार श्वसनाचा संसर्ग, लवकर दम लागणे, हृदयाची धडधड, वजन-उंची न वाढणे, ओठ किंवा नखे निळसर पडणे अशा लक्षणे असलेल्या बालकांनी शिबिराचा लाभ घ्यावा. पालकांनी पूर्वीचे वैद्यकीय अहवाल व २ डी इको रिपोर्ट सोबत आणावेत. पूर्वनोंदणी करून सहभागी होण्याचे आवाहन संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी केले आहे.

## भेसळखोरांवर तातडीने कारवाई करा

### रिपाईचे अन्न व औषध प्रशासनाला निवेदन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यासह श्रीरामपूर तालुक्यात दूध, पनीर, खाद्यतेलासह विविध खाद्यपदार्थांमध्ये भेसळ होत असल्याचा आरोप करत भेसळखोरांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात आली. याबाबत जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांनी अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त गौरव जगताप यांची भेट घेऊन निवेदन दिले.

दूध संकलन केंद्रे व डेअऱ्यांची नियमित तसेच अचानक तपासणी करून तेथील रजिस्टर तपासावेत. पूर्वी मोठ्या प्रमाणात दूध संकलित करणाऱ्या केंद्रांवर सध्या संकलन कमी झाले असल्यास त्याची कारणे शोधावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

पनीरच्या उत्पादन व पुरवठ्यातील बदलाचीही चौकशी करून नमुने प्रयोगशाळेत तपासावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच सूर्यफूल, सोयाबीन, करडई, खोबरेल व शेंगदाणा तेलाच्या नमुन्यांची तपासणी करून उत्पादन खर्च व विक्री दरातील तफावतीची चौकशी करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता उत्पादक, घाऊक व्यापारी व वितरकांच्या संपूर्ण पुरवठा साखळीची तपासणी करावी. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करून सातत्याने धडक तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी त्रिभुवन यांनी केली.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि . ९ ऑगस्ट २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१४६ ४७० ३४४ **१-०** १९० २८० २४४

जोड १४-२०-७३-९८-०६

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१२० १३९ ६७० **३-६** २४० २६० ६००

जोड ३१-७३-९२-०८-६५

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

- **सुटी** -

जोड **सुटी**

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

# द•ख•ल

## केंद्रीय राज्यमंत्री ना. आठवले रविवारी नगरच्या दौऱ्यावर



**अहिल्यानगर :** केंद्रीय राज्यमंत्री तथा सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री ना. रामदास आठवले हे रविवारी अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. येथील वृंदावन लॉन्स आयोजित केलेल्या रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी कै. अशोक गायकवाड यांच्या शोकसभेस ते प्रमुख उपस्थित राहणार आहे. अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांनी दिली.

## मुलांच्या वर्तनातील बदलांकडे पालकांनी गांभीर्याने पाहावे



**अमरापुर :** मुलांच्या वर्तनातील बदल, अतीचंचलता, लक्ष विचलित होणे, उशिरा बोलणे किंवा अध्ययनातील अडचणी याकडे पालकांनी दुर्लक्ष न करता वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे मार्गदर्शन डॉ. कोमल वेदांत लड्ढा यांनी केले. ज्ञानदीप प्राथमिक शाळेत बालवर्तन व 'एडीएचडी' विषयावर पालक व शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. कोमल वेदांत लड्ढा यांच्या बालविकास, बालवर्तन विकास व न्यूरोलॉजी विषयातील फेलोशिपअंतर्गत सुरू असलेल्या शोधनिबंधासाठी सर्वे क्षणाची सुरुवातही यावेळी करण्यात आली. डॉ. कोमल लड्ढा यांनी एडीएचडी, अभ्यासातील प्रगतीचा अभाव, भाषाविकासातील विलंब, बौद्धिक व गतीविषयक विकासातील अडचणी याबाबत मार्गदर्शन केले. मुलांच्या वर्तनातील बदलांची कारणे समजून घेऊन योग्य वेळी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. व्याख्यानानंतर पालकांच्या प्रश्नांना डॉ. संजय लड्ढा यांनी उत्तरे दिली. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून शोधनिबंधासाठी आवश्यक माहिती संकलनास प्रारंभ झाला. एडीएचडीचे प्रमाण, बालवर्तनातील समस्या आणि मोबाईलच्या अतिवापराचे परिणाम यांचा अभ्यास करणे हा सर्वेक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. या उपक्रमासाठी संजय फडके, सोनल शहा, शैलजा राऊळ यांचे सहकार्य लाभत आहे.

## निमगाव वाघात शिक्षक दिनी ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

**अहिल्यानगर :** स्व.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने निमगाव वाघा (ता. नगर) येथे शिक्षक दिनानिमित्त राज्यस्तरीय ग्रामीण मराठी



साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आठवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन असून, यामध्ये राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी सहभागी होणार असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. ५ सप्टेंबरला होणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त गावातून ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. या दिंडीत साहित्यिक व कवी सहभागी होणार आहेत. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने आयोजन करण्यात आले आहे. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार असून, त्याद्वारे ग्रामीण भागातील काव्यप्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ विक्रीचेही आयोजन करण्यात आले आहे.

## देशाच्या विकासात विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे : अच्युतानंद सरस्वती महाराज

**शेवगाव :** आपल्या आयुष्यात शिक्षणाला खूप महत्त्व आहे. जर आपल्याकडे चांगले शिक्षण असेल तर आपले भविष्य चांगले आहे आणि शिक्षणाशिवाय आपण आपल्या आयुष्यात काहीही करू शकत नाही. शिक्षण असे माध्यम आहे, त्याशिवाय आपण जीवनाचे कोणतेही



युद्ध जिंकू शकत नाही आणि शिक्षणाशिवाय आपण चांगले करियर बनवू शकत नाही. शिक्षण हा आपल्या जीवनाचा मुख्य आधार आहे, ज्याद्वारे आपण स्वतःसाठी एक चांगले काम करू शकता.शिक्षणाचा आधार म्हणून विचार करून आपण असे सर्व काही करू शकतो जे आपल्याला चांगले बनवते. आम्ही शिक्षण घेतो आणि आपले उज्ज्वल भविष्य सुरक्षित करतो. जर तुमचे चांगले शिक्षण असेल तर आपण उत्कृष्ट काम करू शकतात. आजच्या काळात शिक्षण खूप महत्वाचे आहे.आजच्या युगात चांगल्या शिक्षणाचे महत्त्व जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे . केवळ पदवी मिळवण्यासाठी शाळा किंवा महाविद्यालयात जाऊन चांगले शिक्षण मिळत नाही. उलट ते तुमच्या जीवनातील चांगल्या विचारांची पातळी वाढवून केले जाते. देशाच्या विकासात विद्यार्थ्यांचे योगदान महत्वाचे आहे, असे प्रतिपादन अच्युतानंद सरस्वतीजी महाराज यांनी केले. आजच्या आधुनिक काळात मोबाईल हा प्रत्येकाच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग झाला आहे. विद्यार्थ्यांसाठीही मोबाईल उपयोगी साधन ठरू शकतो, परंतु त्याचा योग्य आणि मर्यादित वापर करणे आवश्यक आहे. मोबाईलचा चुकीचा वापर केल्यास अभ्यासावर व आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. यावेळी व्यासपीठावर प्रा. बालाजी गायकवाड, अविनाश रामफळे, महेश शिंदे, चंद्रकांत अमृते उपस्थित होते.

## अखिल लोहार समाज विकास संघाच्या राज्य कार्यकारिणीवर विठ्ठल लोखंडे

**बेलवंडी :** अखिल लोहार समाज विकास संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यकारिणीच्या सदस्यपदी बेलवंडी येथील प्रसिद्ध रथनिर्मिती



करणारे श्री. विठ्ठल लोखंडे यांची निवड करण्यात आली. समाज संघटन मजबूत करण्यासह समाजाच्या विकासासाठी कार्य करण्याची संधी मिळाल्याबद्दल त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. समाजाच्या संघटनात्मक कार्याला बळ देत लोहार समाजाच्या विविध प्रश्नांसाठी आणि विकासासाठी प्रयत्न करणार असल्याची भावना विठ्ठल लोखंडे यांनी व्यक्त केली. विठ्ठल लोखंडे यांच्या निवडीबद्दल संघाचे अध्यक्ष संदीप थोरात, विश्वनाथ लोखंडे, विजयकुमार जगताप, मनोज थोरात, नवनाथ हराळे यांच्यासह जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आण्णासाहेब शेलार, बेलवंडी व्यापारी पतसंस्थेचे चेअरमन उत्तम डाके, सरपंच ऋषिकेश शेलार, उपसरपंच बाळासाहेब ढवळे, समता पतसंस्थेचे चेअरमन सुनिल ढवळे, सोपान हिरवे, सोसायटीचे चेअरमन विजय काळाने, युवराज पवार, रहीम हवालदार,अप्पासाहेब आरकस यांच्यासह ग्रामस्थांनी विठ्ठल लोखंडे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ...तर मुकुंदनगरमधील नागरी सुविधा बंद करणार

## मनपा कंत्राटी कामगारावर जीवघेणा हल्ला; कर्मचारी युनियन आक्रमक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरजसिंग राजपूत यांच्यावर मुकुंदनगर परिसरात काम करीत असताना दहा ते बारा जणांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात जखमी झालेल्या राजपूत यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच महापालिका कर्मचारी युनियनच्या वतीने महापालिका प्रशासकीय इमारतीसमोर आंदोलन करून घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. हल्लेखोरांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मुकुंदनगर परिसरात महापालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना वारंवार दमदाटी, शिवीगाळ तसेच कामात अडथळा आणण्याचे प्रकार घडत असल्याचा आरोप कर्मचारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी केला. कर्मचाऱ्यांवर अशा प्रकारे हल्ले होत असतील तर त्यांनी नागरिकांना नागरी सुविधा कशा द्यायच्या, असा सवाल उपस्थित करत हल्लेखोरांवर कारवाई न झाल्यास मुकुंदनगर परिसरातील नागरी सुविधा बंद करण्याचा इशारा युनियनच्या वतीने देण्यात आला.

यावेळी मनपा कर्मचारी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, सचिव आनंद वायकर, जितेंद्र सारसर, कैलास चावरे, बाळासाहेब गंगेकर, विजय कोतकर, किशोर कानडे, गुलाब गाडे, बलराज गायकवाड, सोमनाथ सोनवणे, सतीश ताठे, सोनू चौधरी यांच्यासह महापालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बाबासाहेब मुदगल म्हणाले की, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी



नगरकरांना विविध नागरी सुविधा देण्यासाठी सातत्याने काम करीत आहेत. मात्र, काम करीत असताना कर्मचाऱ्यांवर हल्ले होणे ही गंभीर आणि निषेधार्ह बाब आहे. मुकुंदनगर परिसरात कर्तव्य बजावत असलेल्या धीरजसिंग राजपूत यांच्यावर दहा ते बारा जणांनी हल्ला केला असून या घटनेमुळे महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासकीय कामात अडथळा आणणाऱ्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

कर्मचाऱ्यांवर हल्ले होत असतील तर मुकुंदनगरमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी पाठविणे शक्य होणार नाही. २४ तासांच्या आत हल्लेखोरांवर कारवाई झाली नाही, तर मुकुंदनगर परिसरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती आणि आरोग्य सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला जाईल, असा इशारा बाबासाहेब मुदगल यांनी दिला. महापालिका कर्मचाऱ्यांचे देयके वेळेवर मिळत नसतानाही कर्मचारी जीवाची पर्वा न करता नागरिकांना सेवा देत असल्याचे त्यांनी सांगितले. सचिव आनंद वायकर म्हणाले की, महापालिका कर्मचाऱ्यांवर जीवघेणे हल्ले होत असतील तर कर्मचाऱ्यांनी नागरिकांना नागरी सुविधा कशा द्यायच्या? कर्मचाऱ्यांची थकीत देयके असतानाही ते शहरातील नागरी सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी काम करीत आहेत. मात्र, त्यांच्यावरच हल्ले होत असतील तर ही गंभीर बाब आहे. हल्लेखोरांवर तातडीने कारवाई झाली नाही, तर सोमवारपासून महापालिका बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा त्यांनी दिला.

## गावपुढाऱ्यांमार्फतच ॲट्रॉसिटीचे गुन्हे दाखल : प्रा.चव्हाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील असंख्य गावात राजकीय हेतू डोळ्यासमोर ठेऊन आपले स्वतःचे वर्चस्व राखण्यासाठी प्रत्येक गावात जे २ गट आहेत. ते दोन्हीही गट एकमेकाची जिरवा - जिरवा करण्यासाठी गावातीलच एखाद्या मागासवर्गीय व्यक्तीला हाताशी धरून अनुसूचित जाती/जमाती प्रतिबंधात्मक सारखे गंभीर स्वरूपाचे खोट्या स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यास भाग पडतात (ॲट्रॉसिटीचे) मात्र अशा कृत्यामुळे खरोखर ज्या मागासवर्गीय व्यक्तीवर जातीय वादासारखा अन्याय होत आहे. त्याला मात्र न्याय मिळत नाही. तेव्हा अशा या गावपुढाऱ्यांचा वंचित बहुजन आघाडी जाहीर निषेध करत असल्याबाबतची



माहिती वंचितचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांनी दिली आहे. या बाबत ते म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला अत्यंत मौल्यवान असे संविधान दिले असून त्यामध्ये अनुसूचित जाती/जमाती प्रतिबंधात्मक कायद्या अंतर्गत मागासवर्गीयांना स्वतःच्या स्वसंरक्षणाचे बलाढ्य असे हत्यार दिले असले तरी स्वातंत्र्यानंतर या हत्याराचा कधीच असा एवढ्या मोठ्या प्रमाणात वापर झाला नाही.

## प्रतीक जेवरेचे युपीएससीत यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सीएपीएफ परीक्षेत घवघवीत यश मिळवत देशात ५७ वा क्रमांक पटकावला. कर्जतकरांच्या वतीने नुकताच दादा पाटील महाविद्यालयात त्याचा सन्मान करण्यात आला. सभापती राम शिंदे आणि आ. रोहित पवार यांनी देखील आपल्या



सोशल मीडियावरून अभिनंदन केले. प्रतीक हा कर्जतचे जेष्ठ पत्रकार गणेश जेवरे यांचे सुपुत्र आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सीएपीएफ परिक्षेत कर्जतच्या प्रतीक जेवरे याने असिस्टंट कमांडट या केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या राजपत्रित अधिकारी पदाच्या परिक्षेत देशात ५७ वी रँक प्राप्त करीत कर्जतचे नाव देशपातळीवर कोरले. सीआरपीएफ, सीआयएसएफ, बीएसएफ, आयटीबीएफ, एसएसबी या सैन्यदलात नेतृत्व करण्याची संधी प्रतीकला मिळणार आहे. शुक्रवारी संध्याकाळी त्याचा निकाल लागताच कर्जतमध्ये जल्लोष करण्यात आला. अनेकांनी प्रतिकच्या यशाचे कौतुक करीत त्याच्या कुटुंबावर देखील सोशल मीडियावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. शनिवारी कर्जतच्या दादा पाटील महाविद्यालयात प्राचार्य डॉ संजय नगरकर यांनी पिता-पुत्रांचा सन्मान केला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी सत्कारास उत्तर देताना प्रतीक म्हणाला की, ध्येय समोर ठेवत कठोर मेहनत, अभ्यासात सातत्य ठेवल्यास यश हमखास मिळते. या यशात कुटुंबासह, गुरुजन आणि मार्गदर्शन करणारे सर्वांचे खूप सहकार्य लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील सहज स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकतात असा विश्वास त्याने उपस्थित विद्यार्थ्यांना दिला.

## पवार यांना विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** विश्वबंधुता साहित्य परिषद, पुणे आणि विश्वबंधुता काव्यमंच आणि काव्य प्रकाशन यांच्यावतीने दिला जाणारा विश्वबंधुता प्रकाशदूत साहित्य पुरस्कार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पारनेर तालुका अध्यक्ष अविनाश पवार पारनेर यांना प्रदान करण्यात आला. सन्मानपत्रा मधील मजकूरात असे म्हटले आहे. साहित्यिकाने सत्येचे बटिक न होता लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी समाजाचे भाट झाले पाहिजे. आपण आपल्या वाणी आणि लेखणीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे, समाजपरिवर्तनाचे कार्य सातत्याने निष्ठेने करीत आहात. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या संविधानिक मूल्यांची पेरणी करीत आहात.

## मिरीतील मागासवर्गीयांच्या जमिनीवर सावकारांच्या वारसांचा डोळा?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पाथर्डी तालुक्यातील मिरी येथील मागासवर्गीय कुटुंबाच्या शेतजमिनीवर खाजगी सावकार व त्यांच्या वारसांकडून हक्क सांगत दबाव, दमदाटी व दहशत निर्माण केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सावकाराला मुद्दल व व्याजाची रक्कम अदा केल्यानंतरही जमिनीवर हक्क सांगितला जात असल्याचा दावा करत, जमीन मूळ मालकाच्या वारसांच्या नावे करून देण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. दिलीप राधाजी औताडे, बार्णबस बाबू औताडे, आनंदी उत्तम भाहवे, मंदा वसंत पाटोळे, बबीतादास गायकवाड व बी. डी. गायकवाड यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या उपस्थितीत निवेदन दिले. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, मिरी येथील सर्वे नंबर ९५, गट नंबर ९६, क्षेत्र ७.९२ हेक्टर जमीन त्यांचे आजोबा शंकर खंडू औताडे यांच्या मालकीची होती. मुलाच्या लग्नासाठी सन १९६७ मध्ये सावकाराकडून चारशे रुपये घेऊन २० जुलै १९६७ रोजी गहाणखरेदीखत करण्यात आले होते. त्यानंतर मुद्दल व



व्याजाची रक्कम वेळोवेळी अदा करण्यात आली; मात्र अशिक्षितपणाचा फायदा घेत खरेदीखत उलटून घेण्यात आले नाही, असा आरोप तक्रारदारांनी केला आहे. सावकाराच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांनी अनेक वर्षे जमिनीचा ताबा घेतला नाही. मात्र, आता सावकाराच्या वारसांकडून जमिनीवर हक्क सांगण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. तसेच काही नातेवाईकांकडून प्रत्येकी ५० हजार रुपये घेऊन पाचशे रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर बंधनामा करून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. उर्वरित नातेवाईकांवरही फोनद्वारे व मध्यस्थांमार्फत दबाव आणला जात असल्याचे निवेदनात म्हटले आहे. जमीन देणार नाही, गावात येऊ देणार नाही, अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्याचा तसेच जातिवाचक अपमान केल्याचाही आरोप तक्रारदारांनी केला आहे.

## आयटी क्षेत्रातील करिअर व आव्हाने पेलण्यास विद्यार्थी सक्षम व्हावेत : डॉ. घुले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव :** जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. के. आर. पिसाळ यांनी उपस्थितांचे स्वागत करून मान्यवरांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. ए. शेख यांनी करून दिली. संवाद सत्रादरम्यान मा.बालाजी बिराजदार यांनी आयटी क्षेत्रातील नवीन संधी, डेटा सायन्सचे भविष्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील



> बदलत्या तंत्रज्ञानाशी अद्ययावत राहून संगणकीय कौशल्ये व कोडिंगचे सखोल ज्ञान आत्मसात केल्यास करिअरच्या अथांग संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना 'मायक्रोसॉफ्ट'सारख्या जागतिक दर्जाच्या नामांकित कंपन्यांमध्ये उच्च पदांवर काम करण्याची उत्कृष्ट संधी मिळू शकते. यासाठी पदवीचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी भविष्यातील मुलाखतींची पूर्वतयारी सुरू करणे ही काळाची गरज आहे. सायबर सुरक्षा हे आयटी क्षेत्रातील सध्याच्या लोकप्रिय क्षेत्रांपैकी एक आहे. **मा. बालाजी बिरादार**

करिअरबाबत विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रा. पी. ए. फटांगरे, डॉ. एस. बी. दहातोंडे, प्रा. एस. व्ही. मरकड, डॉ. व्ही. एस. गोडसे व कार्यालय अधीक्षक पी. व्ही. दळवी यांच्यासह संगणक विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## आनंदऋषीजी हॉस्पीटल हे रुग्णांकरीता एक वरदान : उदयोजक अजित बोथरा

### दंतरोग तपासणी व उपचार शिबारात २५० रुग्णांची तपासणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सातत्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल गरीब - गरजू रुग्णांकरीता मोफत शिबीरे घेतात, त्यामुळे रुग्णांकरीता हे एक वरदान ठरत असून ही समाजाच्या दृष्टीने एक चांगली बाब आहे. समाजातील दु:ख निवारण्याचे काम जैन सोशल फेडरेशनच्या माध्यमातून हॉस्पिटलच्यावतीने होत आहे. बोथरा परिवाराचा हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सहभाग आहे आरोग्याच्या या कार्यात बोथरा परिवार सहभागी असल्याचा मनस्वी आनंद होत आहे.या कार्याची व्याप्ती आणखी वाढून त्याचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ व्हावा, यासाठी हॉस्पिटलने आता यापुढेही अशीच सेवा सुरु ठेवावी, असे प्रतिपादन उदयोजक अजित बोथरा यांनी केले.





जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंद ऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ड सर्जरी सेंटर मध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त स्व. लखमीचंदजी बोथरा व स्व. सुशीलाबाई बोथरा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बोथरा परिवाराच्या वतीने आयोजित दंतरोग तपासणी व उपचार शिबिराचे उद्घाटन बोथरा परीवाराच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उदयोजक अजित बोथरा, सौ. प्रतिभा बोथरा, अमन बोथरा,सौ.आकांक्षा बोथरा, सतिश बोथरा,सौ.पूर्वा कोठारी,चि.जैवीक कोठारी,संतोष बोथरा, माणकचंद कटारीया, सतीश लोढा,सुभाष मुनोत, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, डॉ. अर्पणा पवार, डॉ. स्वराज ढोले, डॉ. अश्विनी बालगुडे, डॉ. तृप्ती डुंगरवाल, डॉ. प्रणव डुंगरवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

आकांक्षा बोथरा म्हणाल्या रूग्णसेवा हा एक यज्ञ असून तो सातत्याने चालविणे अवघड काम आहे हे अवघड शिवधनुष्य पेलण्याचे काम जैन सोशल फेडरेशनचे सर्व पदाधिकारी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने करत आहे हे गौरवास्पद बाब आहे. समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती सेवा दिली जात आहे जे कार्य केले जाते पूर्ण श्रध्देने व निष्ठेने केले जात आहे. या कार्यात बोथरा परिवाराची पिढी सहभागी होत असल्याने सुख-समाधान-शांती लाभत असल्याचे सांगितले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, हे सामाजिक कार्य अजून जोमाने करण्याचा मानस आहे. साामजिक बांधिलकीच्या माध्यमातून अत्याधुनिक मशिनरी व तज्ञ डॉक्टरांमार्फत कमी दरात रुग्णांना सेवा देण्याचा सातत्याने प्रयत्न हॉस्पिटलच्यावतीने सुरु असल्याचे सांगितले. बोथरा परिवार सारखे दानशूर व्यक्तीमुळेच हे शक्य झाले आहे आरोग्याच्या या यज्ञात बोथरा परिवार पुढची पिढी सहभागी झाली आहे

डॉ. अर्पणा पवार म्हणाल्या दंतरोगात वेळेत उपचार घेणे गरजेचे आहे पुढे होणारे धोके त्यामुळे कमी होतात शिबिराच्या माध्यमातून अल्पदरात उपचार होणार आहेत अनेक प्रकारचे आधुनिक मशिनरी, सुपरस्पेशालिस्ट डॉक्टर यात सहभागी असल्याने तुमची योग्य ती काळजी घेतली जाते.

## महापुराने उद्ध्वस्त बंधारे पुन्हा उभे आव्हाड यांच्या पाठपुराव्याला यश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे वडुले खुर्द व वाघोली गावांच्या मध्यातून वाहणाऱ्या वृद्धा नदीला आलेल्या महापुरात नदीवरील कोल्हापूर टाईप बंधाऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. साखळी बंधारे फुटल्याने नदीतील पाणी अडविण्याची क्षमता कमी झाली होती. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर वडुले खुर्द येथील माजी सैनिक संघ, शेवगावचे कोषाध्यक्ष तथा माजी सैनिक सुरेश जनार्दन आव्हाड यांनी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांना वर्षभर पाणी उपलब्ध व्हावे आणि भूजलपातळी वाढावी, या उद्देशाने त्यांनी या कामासाठी पुढाकार घेतला.

त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, महाराष्ट्र शासनाचा जलसंधारण विभाग, नाम फाऊंडेशन आणि टाटा मोटर्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'गाळमुक्त शिवार, नदी खोलीकरण व रुंदीकरण' या उपक्रमांतर्गत वृद्धा नदीवरील नादुरुस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

बंधारे दुरुस्त झाल्याने नदीपात्रातील पाणी अडविणे शक्य होणार असून, खोलीकरण व रुंदीकरणामुळे पाणीसाठवण क्षमता वाढणार आहे. तसेच पाणी जमिनीत मुरल्याने परिसरातील विहिरी, बोअरवेल व अन्य जलस्रोतांची पाणीपातळी वाढण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे. सैनिक सीमेवरच नाही, संकटांशीही लढतो देशाच्या सीमेवर शत्रूशी लढणारा सैनिक निवृत्तीनंतरही समाजाच्या प्रश्नांसाठी योगदान देऊ शकतो, याचे उदाहरण सुरेश आव्हाड यांच्या कार्यातून दिसून येत आहे. वृद्धा नदीवरील बंधाऱ्यांच्या दुरुस्तीमुळे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असून, या कामाचे परिसरात कौतुक होत आहे.

# पुणे विभागात ९५ हजारावर शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण

- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना
- शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करुन घेण्याचे प्रशासनाचे आवाहन
- कर्जमुक्तीच्या पहिल्या यादीत ६१५ कोटी रुपयांहून अधिक रक्कम कर्ज खात्यात जमा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत पुणे महसूल विभागातील पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील ९५ हजार ६०३ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहेत, अशी माहिती सहकार विभागाच्यावतीने देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास शुक्रवारी (७ ऑगस्ट) सुरुवात करण्यात आली; यामध्ये कर्जमुक्तीच्या पहिल्या यादीत पुणे जिल्ह्यातील ३८ हजार ९७० पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर ३४५ कोटी २५ लाख ५ हजार ५९४ रुपये जमा करण्यात आले आहेत. यात सातारा जिल्ह्यातील १९ हजार ५८ शेतकऱ्यांना १४२ कोटी ७ लाख ३९ हजार २८४ रुपये आणि सोलापूर जिल्ह्यातील ११ हजार ३९४ शेतकऱ्यांना १२८ कोटी १० लाख ४४ हजार १६१ रुपये याप्रमाणे ६९ हजार ४२२ शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण ६१५ कोटी रुपयाहून अधिक रक्कम कर्ज खात्यावर जमा करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील १ हजार ३५१, भोर २ हजार ३०८, मुळशी ५७६, मावळ १ हजार ३५२, खेड २ हजार २०८, शिरुर ४ हजार ७२९, आंबेगाव १ हजार ३५१, इंदापूर ९ हजार २३१ , वेल्हा ४१९, जुन्नर २ हजार १५५, बारामती ८ हजार ५७८, पुरदंर ३ हजार १४३ आणि दौंड १० हजार ६५३ तालुक्यात तसेच राष्ट्रीय व इतर बँकेमार्फत २ हजार ३९७ असे एकूण ५० हजार ४४८ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण गुरुवारअखेर पूर्ण झाले आहे.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील ३ हजार १०७, पाटण १ हजार ८८६, महाबळेश्वर १९४ , जावळी ६९८, वाई ८४१, खंडाळा १ हजार ३७१, फलटण ४ हजार ४९३, माण ३ हजार ८०१, खटाव २ हजार ९५३, कोरेगांव ४ हजार १२४ आणि सातारा तालुक्यातील १ हजार ९५६ एकूण २५ हजार ४२४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण गुरुवारअखेर पूर्ण झाले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील ७५, दक्षिण सोलापूर १२५, पंढरपूर ५५८, सांगोला २७६, माळशिरस ५९८, बार्शी १६७, करमाळा ४५७, मोहोळ ३४२, माढा ३४८, अक्कलकोट ९३ आणि मंगळवेढा ७३७ तसेच राष्ट्रीय व इतर बँकेमार्फत १५ हजार ९५५ एकूण १९ हजार ७३१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण कालअखेर पूर्ण झाले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जावून आपले आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे. आधार प्रमाणीकरण करुन घेतल्यानंतरच शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात रक्कम जमा होणार आहे तसेच नवीन पीक कर्ज घेण्यासही शेतकरी पात्र होणार आहेत, त्यामुळे आपले आधार प्रमाणीकरण करुन करुन घ्यावे, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## दखल

### वाघीरे विद्यालयात शंकर पाटील यांच्या कथांचे कथाकथन



**माळशिरस :** ज्येष्ठ साहित्यिक व ग्रामीण कथाकार शंकर पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सासवड येथील वाघीरे विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या कथांचे कथाकथन आयोजित करण्यात आले. 'वाचू आनंदे कट्टा' आणि 'पुरंदर कलामंच' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी, मराठी साहित्याची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांच्यातील सर्जनशीलतेला चालना मिळून भविष्यातील लेखक व कवी घडावेत, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कथाकथन कार्यक्रमात स्नेहल देशपांडे, रेश्मा कामथे, कल्याणी चिंबळकर, ऋतुजा राऊत आणि रेखा चौधरी यांनी शंकर पाटील यांच्या विविध कथांचे प्रभावी सादरीकरण केले. रेश्मा कामथे यांच्या 'श्री गणेशा' या पुस्तकातील 'सावली' या कथेच्या अभिवाचनाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी वाघीरे विद्यालयाच्या पर्यवेक्षिका अर्चना लडकत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. संगीता रिकामे यांनी 'वाचू आनंदे कट्टा'च्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना साहित्याच्या जवळ नेणारा आणि वाचनाची गोडी निर्माण करणारा हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

### तीनशे विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप



**जेजुरी :** कै. सुधाकर वामन खंडागळे अध्यासन आणि डॉ. प्रसाद खंडागळे मित्र परिवाराच्या वतीने जेजुरी व परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील तीनशे विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.जेजुरी येथील जिल्हा परिषद जननी प्राथमिक शाळेत शनिवारी (ता. ८) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषद शाळा क्रमांक १, मुलींची जननी शाळा, जुनी जेजुरी शाळा आणि रेल्वे स्टेशन शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांना यावेळी शैक्षणिक साहित्य देण्यात आले. श्री खंडोबा देवाचे अभ्यासक, ग्रंथकार आणि माजी शिक्षक कै. सुधाकर खंडागळे यांच्या स्मरणार्थ दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. डॉ. प्रसाद खंडागळे मित्र परिवाराच्या वतीने जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये अवकाश निरीक्षण प्रयोगशाळा, शौचालये, संगणक व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच जेजुरीतील लोककलावंत, वाघ्या-मुरळी यांना आर्थिक मदत, गरजू कुटुंबांना दिवाळी साहित्य, स्थानिक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी मल्हार महोत्सव आणि रामनवमी निमित्त नारदीय कीर्तन सेवा असे विविध उपक्रम राबविले जातात.डॉ. प्रसाद खंडागळे यांनी सांगितले की, आतापर्यंत सामाजिक हिताच्या विविध उपक्रमांवर तीन कोटी रुपयांहून अधिक खर्च करण्यात आला आहे.कार्यक्रमास हभप सयाजी महाराज मोहरकर, जेजुरी सेवा केंद्राचे डॉ. नितीन केंजळे, प्रकाश खाडे, जेजुरी देवस्थानचे माजी विश्वस्त नितीन राऊत, कुंडलिक भोसले, पुष्कर खाडे आणि चैत्यन खाडे उपस्थित होते.यावेळी जेजुरी जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका विजया कुंजीर, मुख्याध्यापक रवींद्र हिंगणे, शिक्षक नवनाथ वाल्हेकर, स्वाती बारभाई, स्वाती जगताप, प्रणाली कदम, शिवाजी शितोळे तसेच विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# आरटीओच्या नवीन नियमांमुळे कामकाज ठप्प ; वाहनधारकांची तारांबळ

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पुणे जिल्ह्यातील ३८ हजार ९७० पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात काल, दि. ७ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची रक्कम ऑनलाइन पद्धतीने संबंधित बँकांच्या कर्जखात्यात वर्ग करण्यात आली.

पुणे जिल्ह्यातील या ३८ हजार ९७० शेतकऱ्यांची एकूण थकबाकी ३४५ कोटी २५ लाख ५ हजार ५९४ रुपये आहे. ही रक्कम थेट संबंधित बँकांकडे वर्ग झाल्याने पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला आहे.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे तसेच सहकार आयुक्त दीपक तावरे उपस्थित होते. तसेच सर्व पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि सहकारी संस्थांचे निबंधक दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

राज्यात या योजनेअंतर्गत आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या सुमारे ६ लाख २२ हजार पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर ५ हजार २८ कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत.

जुन्नर, आंबेगाव, खेड तालुक्यामध्ये अनेक सुशिक्षित बेरोजगारांनी बँकांमार्फत कर्ज घेऊन ड्रायव्हिंग स्कूल सुरू केले आहेत. त्यांचे हप्ते भरताना सुद्धा त्यांना अनंत अडचणी येत आहे. सरकारने याचा योग्य विचार करावा औद्योगिक केंद्रांना परवानगी देण्यास आमचा प्रखर विरोध असणार आहे.

**–अनिल शिंदे**
समन्वयक
जुन्नर' आंबेगाव 'खेड तालुका ड्रायव्हिंग स्कूल असोशियन.

पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात सर्व कामे शासकीय नियमानुसार चालू आहेत नागरिकांची काही तक्रार अडचणी असल्यास त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा त्यांचे निश्चित निराकरण करण्यात येईल.

**श्री राहुल जाधव**
– उपप्रादेशिक परिवहन अधिकारी
पिंपरी चिंचवड

# परिसरात होणाऱ्या चोऱ्या रोखण्यासाठी सीसीटीव्ही बसवा

## शिक्रापूर पोलिसांचे परिसरातील नागरिकांना आवाहन

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** सध्या अनेक ठिकाणी चोऱ्यांचे प्रमाण वाढत असुन चोऱ्यांचे प्रकार रोखण्यासाठी व चोरी करणाऱ्या व्यक्तींची उकल करण्यासाठी सीसीटीव्ही महत्वाचा घटक असून नागरिकांनी आपल्या परिसरात व घराला सीसीटीव्ही बसवावे असे आवाहन शिक्रापूर पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) पोलीस स्टेशन हद्दीमध्ये वाड्या, वस्त्या तसेच गावालगतच्या परिसरात घरफोडी, चोरीच्या घटना घडत असून ज्या परिसरात सीसीटीव्ही असेल तेथील चोरीच्या गुन्ह्यांची उकल करणे सोपे होते. मात्र ज्या भागात कोठेच सीसीटीव्ही नाही तेथील गुन्हे उघड करण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे, त्यामुळे नागरिकांनी सुरक्षित घर – सुरक्षित परिसर – सुरक्षित समाज या संकल्पनेत प्रत्येक वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी घर, सोसायटी तसेच परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवणे महत्त्वाचे असून सीसीटीव्ही मुळे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवता येऊन गुन्हा घडल्यास तपासासाठी महत्त्वाचे पुरावे पोलिसांना उपलब्ध होण्यास मदत होते, तसेच सीसीटीव्हीच्या माध्यमातून गुन्हेगारांची ओळख पटविणे, त्यांच्या हालचालींचा मागोवा घेणे आणि पोलिस तपासाला गती देणे शक्य होते, त्यामुळे नागरिकांनी आपल्या घराबाहेरील परिसर, प्रवेशद्वार तसेच महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवून ते नियमितपणे कार्यरत ठेवावे असे आवाहन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी नागरिकांना केले आहे.

# मुखईच्या मतदार यादीत १९६ बोगस मतदार ?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुखई :** शिरूर तालुक्यातील मुखई गावातील मतदार यादीत तब्बल १९६ बोगस मतदारांची नोंद झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून, याबाबत आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार सचिन वाघ यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. मुखईच्या माजी सरपंच संयोगिता पलांडे यांनी याबाबत माहिती दिली.

मुखई येथील मतदार यादीतील भाग क्रमांक ३२३, ३२४ आणि ३२५ मध्ये जून २०२६ पर्यंत मोठ्या प्रमाणावर संशयास्पद मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आल्याचा तक्रारदारांचा आरोप आहे.

या मतदारांचे मुखई गावात घर, जमीन, रेशनकार्ड अथवा अन्य कोणतीही मालमत्ता नसून, ते गावात भाडेकरू म्हणूनही राहत नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यातील काही व्यक्ती पुणे महापालिका हद्दीतही मतदान करत असल्याचे पुराव्यांसह प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

बोगस आधारकार्ड तसेच चुकीच्या पद्धतीने भरलेल्या एआयआर अर्जांचा वापर करून मतदार नोंदणी करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मुखई ग्रामपंचायत प्रशासकीय समितीच्या सदस्यांनी संबंधित मतदारांच्या मालमत्तेची कागदपत्रे तसेच ते भाडेकरू असल्यास भाडेकराराची माहिती ग्रामपंचायत आणि तलाठी कार्यालयाकडे मागितली होती. मात्र, अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्याने निवडणूक प्रशासनाकडे तक्रार करण्यात आली.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, तपासणीअंती १७८ संशयित नावे आढळून आली आहेत. विशेष म्हणजे, चार महिन्यांपूर्वी झालेल्या जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी या मतदारांची नावे यादीत नसताना अचानक मोठ्या प्रमाणावर नावे वाढल्याचा आरोप आहे. या संपूर्ण प्रकारामागे बीएलओ आणि ऑपरेटर यांचे संगनमत असल्याचा आरोपही तक्रारदारांनी केला असून, गावात वास्तव्यास नसलेल्या व्यक्तींची मतदार म्हणून झालेली नोंदणी तपासून संबंधित यंत्रणेचा पर्दाफाश करण्याची मागणी केली आहे.

पंचनामा करून अहवाल मागविला

मुखई येथील तक्रारीची दखल घेऊन आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार सचिन वाघ यांनी मंडलाधिकारी गणपत मरभळ आणि तलाठी आबासाहेब मोरे यांना पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत. पंचनामा व अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे सचिन वाघ यांनी सांगितले.

# गोपाळ रत्न पुरस्कारासाठी १० ऑगस्टपासून अर्ज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** देशातील दुग्धव्यवसायाला चालना देतानाच देशी गोवंशाच्या संवर्धन व विकासासाठी केंद्र सरकारच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे. या पुरस्कारासाठी पात्र शेतकरी, दुग्ध सहकारी संस्था, दुग्ध उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक संघटना आणि कृत्रिम रेतन तंत्रज्ञांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे. अर्ज नोंदणीला १० ऑगस्ट २०२६ पासून सुरुवात होणार असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत १० सप्टेंबर २०२६ आहे. केंद्र सरकारच्या मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागामार्फत राष्ट्रीय गोकुळ मिशनअंतर्गत २०२१ पासून दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. देशी गाय व म्हशींच्या प्रजातींचे जतन, संवर्धन तसेच वैज्ञानिक पद्धतीने विकास करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे आणि शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे हा या पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे.राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कारासाठी तीन प्रमुख श्रेणी निश्चित करण्यात आल्या आहेत. यामध्ये उत्कृष्ट दुग्ध उत्पादक शेतकरी, उत्कृष्ट दुग्ध सहकारी संस्था/दुग्ध उत्पादक कंपनी (एमपीसी)/शेतकरी उत्पादक संघटना (एफपीओ) आणि उत्कृष्ट कृत्रिम रेतन तंत्रज्ञ यांचा समावेश आहे. प्रत्येक श्रेणीत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक तसेच ईशान्येकडील व हिमालयीन राज्यांसाठी विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. पहिल्या दोन श्रेणीतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी पाच लाख रुपये, द्वितीय क्रमांकासाठी तीन लाख रुपये, तृतीय क्रमांकासाठी दोन लाख रुपये, तर विशेष पुरस्कारासाठी दोन लाख रुपये, मानपत्र व स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे. कृत्रिम रेतन तंत्रज्ञ या श्रेणीतील विजेत्यांना मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल; या श्रेणीत रोख पारितोषिक दिले जाणार नाही. पात्र उमेदवार व संस्थांनी राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत. राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल तसेच अधिक माहितीसाठी केंद्रीय पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे संकेतस्थळ पाहावे. पुरस्कार वितरण २६ नोव्हेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय दूध दिनानिमित्त करण्यात येणार आहे.

# भांगलेवाडीचा रस्ता ८ दिवसांपासून बंद

## शाळकरी मुलांना शाळेत जाण्याची मोठी अडचण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आंबेगाव :** आंबेगाव तालुक्यातील असाणे ग्रामपंचायत हद्दीतील भांगलेवाडी येथे डोंगराचा गाळ रस्त्यावर आल्याने गेल्या आठ दिवसांपासून रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, शाळकरी मुलांना गेल्या आठ दिवसांपासून शाळेत जाता आलेले नाही.यापूर्वी रस्ता बंद झाल्यानंतर ग्रामपंचायतीने जेसीबीच्या साहाय्याने रस्ता खुला केला होता. मात्र यावेळी आठ दिवस उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

गेल्या २५ वर्षांपासून रस्त्याची मागणी करूनही प्रश्न कायम आहे. पावसाळ्यात आजारी व्यक्तीला रुग्णालयात नेण्याचीही मोठी अडचण निर्माण होते. निवडणुकीच्या काळात रस्त्याची आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात रस्ता होत नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली.

आमचे हाल कधी संपणार? असा सवाल करत प्रशासनाने तातडीने रस्ता खुला करून कायमस्वरूपी रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी भांगलेवाडी ग्रामस्थांनी केली आहे.



# रस्ते ३१ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करण्याचे निर्देश

## ब्लॅक स्पॉटचे निरीक्षण करून १० ऑक्टोबरपूर्वी आवश्यक उपाययोजनांद्वारे निर्मूलन करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** जिल्ह्यातील रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रशासनाने आता ब्लॅक स्पॉट, अपघातप्रवण जंक्शन, खड्डे आणि महामार्गालगतची अतिक्रमणे यावर वेळबद्ध कारवाई सुरू केली आहे. जिल्ह्यातील सर्व ब्लॅक स्पॉटचे निरीक्षण करून १० ऑक्टोबरपूर्वी आवश्यक उपाययोजनांद्वारे निर्मूलन करावे, अपघातप्रवण जंक्शनची सुधारणा सहा महिन्यांत करावी, तसेच जिल्ह्यातील रस्ते ३१ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. महामार्गालगतची अतिक्रमणेही १५ दिवसांत हटवावीत, असेही त्यांनी संबंधित यंत्रणांना सांगितले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक जिल्हाधिकारी डुडी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. यावेळी पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, अधीक्षक अभियंता भरत कुमार बाविस्कर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.बैठकीत अपघातप्रवण स्थळे, रस्त्यांची सुरक्षितता, वाहतूक नियमन, जंक्शन सुधारणा, खड्डे, अतिक्रमणे आणि रस्ता सुरक्षा जनजागृतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीत निरीक्षण करून निश्चित करण्यात आलेल्या ४३ ब्लॅक स्पॉटवर राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या ठिकाणी केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता अपघातांची कारणे शोधून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. रस्त्यांची रचना, वळणे, चौक, प्रकाश व्यवस्था, दिशादर्शक व सूचना फलक, रस्त्यांवरील पट्टे आदींची पाहणी करून आवश्यक स्थापत्य सुधारणा कराव्यात. गतिरोधक निर्धारित तांत्रिक निकषांनुसारच उभारावेत, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, वेगमापन यंत्रणा आणि पुरेशी प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. अपघातप्रवण स्थळांचे भौगोलिक अंकन करून वाहनचालकांना आगाऊ सूचना मिळतील, यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

**जंक्शन सुधारणा, खड्डे व अतिक्रमणांवर कठोर कार्यवाही :**

जिल्ह्यातील अपघातप्रवण जंक्शनची सुधारणेची कामे पुढील सहा महिन्यांत पूर्ण करावीत. रस्त्यांवरील सर्व खड्डे भरण्याची कार्यवाही ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करावी. रस्ते सुरक्षिततेच्या कामात कोणतीही दिरंगाई होणार नाही, याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. राष्ट्रीय महामार्ग तसेच प्रमुख महामार्गालगतची अतिक्रमणे संबंधितांनी १५ दिवसांच्या आत स्वतःहून काढून घ्यावीत. निर्धारित मुदतीत अतिक्रमणे न हटविल्यास संबंधित महामार्ग यंत्रणांनी पोलीस विभागाच्या मदतीने ती तातडीने हटवावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.

**रस्ते कामाच्या ठिकाणी सुरक्षा उपाययोजनांकडे दुर्लक्ष नको :**

जिल्ह्यात ज्या ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू आहेत, त्या ठिकाणी वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक दिशादर्शक, सूचना फलक आणि सुरक्षा उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.


**बारामती तालुका सहकारी दूध उत्पादकसंघ मर्या**
**कसबा, बारामती जि. पुणे**
फोन नं. ०२११२-२९९३७२, मो नं.९५४५४५००३५
ई मेल- btd.pur@gmail.com

**ई टेंडर नोटीस**

आमच्या बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघाच्या पशुखाद्य विभागासाठी शटर दुरुस्त करावयाचे आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे ई. टेंडर मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | तपशील | पुरवठा/नग | बयाणा रक्कम रु. | टेंडर फी (ना परतावा रक्कम) |
|---|---|---|---|---|
| 1 | Tender of Supply Installation Shutter in Nandan Cattle Feeds | 1 JOB | 10,000/- | 1,000/- + GST (18%) |

सदर निवेदेतील मालाचा तपशील, अनामत रक्कम, नियम अटी, शर्थी इत्यादी माहिती **दि. ०९/०८/२०२६ सकाळी ११.००** पासून संघाच्या www.indiaengineering.com/baramatitender या वेबसाईटवरती गेल्यानंतर Currently Online Tenders ला क्लिक केल्यास पहावयास मिळतील. सदर ई टेंडर प्रक्रिया अंतर्गत **निविदा दि. ०९/०८/२०२६ सकाळी ११.०० ते दि. १४/०८/२०२६ सकाळी ११.००** वाजेपर्यंत ई टेंडर पद्धतीने वेबसाईटवरूनच भरता येईल.

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

डॉ. योगेश वा.राणे, व्यवस्थापकीय संचालक | पुरुषोत्तम.शि.गाढवे, व्हा. चेअरमन | किशोर. भ. फडतरे, चेअरमन

**बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघ**

द • ख • ल

## हरिनामाच्या गजराने शिराळ दुमदुमले शिराळ ते नेवासा पायी दिंडी चेप्रस्थान



**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील शिराळ येथूनहरी नामाच्यागजरात शिराळ ते नेवासा पायी दिंडी सोहळ्याचेप्रस्थान ह भ प भाऊसाहेब महाराज काकडे तसेच भाऊसाहेब महाराज मुळे यांच्या मार्गदर्शनाखालीमाऊली माऊली म्हणत नेवासाच्या दिशेने प्रस्थान झाले. पंढरपूर येथून दिंडी आल्यानंतर परत ज्ञानेश्वर माऊलीच्या भेटीसाठी पुन्हा दिंडी नेवासा येथे जाते. या दिंडी सोहळ्यात गावातील ह भ प भाऊसाहेब महाराज काकडे ह भ पसंजय महाराज मुळे ह भ प भाऊसाहेब महाराज मुळे ह भ प रामदास महाराज गोरे ह भ प उद्धव गोरे तसेच मेजर चांगदेव तुपे संजय गोरे सुनील मुळे प्रभाकर मुळे शिवाजी दादा घोरपडे रोहिदास बोरुडेएकनाथ मुळे आधी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिंडी घोडेगाव वडाळा नेवासा फाटा मार्गे नेवासा ज्ञानेश्वर माऊली मंदिर येथे पोहोचेल.

## श्री नागेश्वर विद्यालयात आरोग्य जनजागृतीचा प्रेरणादायी उपक्रम



**चिलवडी :** किशोरवयीन मुलींच्या आरोग्य, स्वच्छता आणि आत्मविश्वासाच्या जडणघडणीसाठी समाजात अशा उपक्रमांची नितांत गरज असताना पार्थ वेलफेअर फाउंडेशनने पुढाकार घेत श्री नागेश्वर विद्यालय, चिलवडी येथे 'कळी उमलताना' या महत्त्वपूर्ण विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केला. या कार्यक्रमात तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. जयश्री मुळे यांनी विद्यार्थिनींना वयात येताना होणारे शारीरिक व मानसिक बदल, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी, संतुलित आहार, आरोग्यदायी सवयी आणि आत्मविश्वासाने जीवन जगण्याबाबत अत्यंत समर्पक व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध शंकांचे निरसन करून घेतले. या उपक्रमाचे आयोजन पार्थ वेलफेअर फाउंडेशनचे अध्यक्ष शांताराम पडवळकर व उप.अध्यक्ष.संतोष लट्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी ऋतुजा पडवळकर यांचीही उपस्थिती होती. किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्याविषयी वैज्ञानिक दृष्टीकोन, स्वच्छतेच्या सवयी आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत मोलाचा ठरला. उपस्थित मान्यवरांनी पार्थ वेलफेअर फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत अशा जनजागृतीपर कार्यक्रमांची प्रत्येक शाळेत आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

## कर्जतचे पो. नि. गायकवाड यांचे राशीनमध्ये स्वागत



**राशीन :** कर्जत पोलीस स्टेशनचे नवनिर्वाचित पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड साहेब यांनी आपल्या सहकारी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासमवेत राशीनच्या ग्रामदैवत श्री जगदंबा देवी मंदिरात दर्शन घेतले. यावेळी श्री जगदंबा देवीचे मानकरी पुजारी श्री शिरीष रेणुकर यांच्या उपस्थितीत देवीची पूजा-अर्चा करून आशीर्वाद घेतला. पोलीस निरीक्षक गायकवाड साहेब यांच्या राशीन आगमनानिमित्त गुरव समाज सेवा संस्था, राशीन यांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेचे सचिव ड. सचिन अरुण रेणुकर, तसेच विलास रेणुकर, सुरवसे मिस्त्री यांच्यासह समाजबांधवांच्या उपस्थितीत गायकवाड साहेबांना शाल, फेटा व श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. नवनिर्वाचित पोलीस निरीक्षकांच्या मंदिर भेटीमुळे राशीनमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, गुन्हेगारीला आळा घालणे, नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे आणि पोलीस-नागरिकांमध्ये विश्वासाचे नाते अधिक दृढ करणे, या अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहेत. यावेळी पोलीस स्टाफ, गुरव समाजाचे पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रविवार-सोमवार दोन दिवस गोदड महाराजांचा रथोत्सव

**कर्जत :** कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरु गोदड महाराज यांचा रथोत्सव ९ आणि १० ऑगस्ट रोजी साजरा होणार असून या सोहळ्यासाठी ट्रस्ट, यात्रा समिती आणि प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे. दोन दिवस चालणाऱ्या या रथोत्सवासाठी लाखो भाविक उपस्थित राहतात. कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरु गोदड महाराजांची रथयात्रा



कामीका एकादशीला मोठ्या उत्साहात आणि भक्तीपूर्ण वातावरणात भरते. रविवारी पहाटेपासूनच भाविकांची अभिषेक आणि दर्शनासाठी मोठी रांग लागते. दर्शन सुलभ व्हावे यासाठी या ट्रस्ट, यात्रा समिती तसेच स्थानिक प्रशासनाकडून विशेष खबरदारीचा आढावा घेतला गेला. मागील वर्षीप्रमाणे यंदा देखील संत सद्गुरु गोदड महाराजांच्या रथाचे दर्शन कर्जतच्या भाविकांना प्रकाश-झोतात व्हावे यासाठी कर्जत नगरपंचायत आणि महावितरण प्रयत्नशील आहेत. रथोत्सवासाठी कर्जत बसस्थानक परिसर, ईदगाह मैदान तसेच दादा पाटील महाविद्यालयाच्या समोरील प्रांगणात मनोरंजन नगरी सज्ज झाली आहे. यात रहाट पाळणे, मनोरंजनाचे जादुई खेळ यासह खेळणी आणि खाद्यपदार्थचे स्टॉल उभारण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या गोदड महाराज रथोत्सवासाठी गोदड महाराज ट्रस्ट, यात्रा समिती, पुजारी, सेवेकरी, मानकरी, ग्रामस्थ यासह स्थानिक प्रशासनाकडून भाविकांच्या सुलभतेसाठी जय्यत तयारी सुरू आहे. यात्रेनिमित्त दोन दिवस दर्शनासाठी लाखो भाविक उपस्थिती लावतात. यात्रेच्या दिवशी दुपारी १२ वाजता गोदड महाराजांचा लाकडी रथ ग्रामप्रदक्षिणेसाठी रवाना होतो. ठिकठिकाणी रथ ओढण्यासाठी भाविक मोठी गर्दी करतात. संध्याकाळी उशिरा ग्रामप्रदक्षिणा पूर्ण करीत रथ पुन्हा मंदिरात येत आरती पार पडते. दुसऱ्या दिवशी कर्जत तालुक्यासह पर जिल्ह्यातील नामांकित पैलवानांच्या उपस्थितीमध्ये कुस्तीचे मैदान होत हगाम्याने यात्रेची सांगता होते.

# वडिलांचे स्वप्न.. मुलाचा ध्यास.... वांबोरी चारीला आ. अक्षय कर्डिलेंचा वेग!

## पांढरीपूल येथे कामाची पाहणी; १२ गावांतील ३२ तलावांना मिळणार पाणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या वांबोरी चारी टप्पा दोनच्या कामाला आता वेग येणार असून, या योजनेमुळे १२ गावांतील ३२ तलावांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

पांढरीपूल येथे वांबोरी चारीच्या कामाची पाहणी करून कामाचा शुभारंभ आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आला. मुळा धरणाची पाणीपातळी ८० टक्क्यांच्या पुढे गेली असून, लवकरच वांबोरी चारीला मुळा धरणातून पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे वांबोरी चारीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा



दिलासा मिळणार आहे.

वांबोरी चारी टप्पा दोनच्या कामाकडे माझे विशेष लक्ष आहे. या टप्प्यात राहुरी, नगर आणि पाथर्डी मतदारसंघातील १२ गावांतील ३२ तलावांचा समावेश आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण करून लाभधारक शेतकऱ्यांना पाणी मिळवून देणे माझे प्राधान्य आहे. स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी वांबोरी चारी योजनेसाठी ९२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून या भागातील शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या प्रयत्नातून सुरू झालेली ही योजना पूर्णत्वास नेण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत. काम पूर्ण करताना निधीची प्रशासकीय मंजुरीची किंवा अन्य कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाली तरी ती सोडविण्यासाठी आपण शासनस्तरावर पाठपुरावा करू

वांबोरी चारीचे स्वप्न स्व. शिवाजी कर्डिले यांनी पाहिले. ते पूर्ण करण्यासाठी आ. अक्षय कर्डिले यांनी घेतलेला पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी पोहोचविण्यासाठी त्यांचा सुरू असलेला पाठपुरावा पाहता बळीराजाच्या चेहऱ्यावरचा आनंद हीच त्यांच्या कार्याची खरी पावती ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांची जाण असणारे लोकनेते म्हणून अक्षय कर्डिले यांची ओळख निर्माण झाली आहे.
**सोमनाथ हारेर, माजी सरपंच, खोसपुरी**

अशी ग्वाही आमदार अक्षय कर्डिले यांनी दिली. वांबोरी चारीचे पाणी मिळाल्यानंतर या भागातील शेतीला मोठा आधार मिळणार असून शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला या योजनेमुळे शाश्वत पाण्याचा स्रोत उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होण्यासह आर्थिक परिस्थिती सुधारण्यासही हातभार लागणार आहे.शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचवणे हा केवळ विकासकामाचा भाग नसून त्यांच्या जीवनमानाशी जोडलेला प्रश्न आहे. त्यामुळे वांबोरी चारी टप्पा दोनचे काम कोणत्याही परिस्थितीत रखडू देणार नाही. लवकरात लवकर काम पूर्ण करून १२ गावांतील ३२ तलावांमध्ये पाणी पोहोचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करू असेही आमदार अक्षय कर्डिले यांनी स्पष्ट केले.

# नान्नज आज कडकडीत बंद

## भोसले यांच्या उपोषणला नान्नज ग्रामस्थांचा पाठींबा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील नान्नज येथील काँग्रेसचे ता.अध्यक्ष शहाजी राजेभोसले यांचा उपोषणाचा तिसरा दिवस असुन रविवार दि. ९ रोजी नान्नज शहर ग्रामस्थांच्या वतीने कडकडीत बंद ठेवण्यात येणार आहे प्रलंबित मागण्यांसाठी कायदेशीर मार्गाने उपोषणास बसलेले शहाजी राजेभोसले यांच्या उपोषणास जाहीर पाठिंबा म्हणून नान्नज गाव आज कडकडीत बंद ठेवण्यात येणार आहे

नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी अत्यावश्यक सेवा वगळण्यात आल्या आहेत त्या मध्ये वैद्यकीय सेवा, औषधाची दुकाने, दुध या सेवांचा समावेश



आहे नान्नज गावात अत्यावश्यक सेवा नेहमी प्रमाणे सुरू राहणार व नान्नज गाव बंद अत्यंत शांततेत व संयमाने व लोकशाही मार्गाने पाळण्यात येणार आहे

उपोषणकर्ते राजेभोसले यांनी मांडलेल्या मागण्या अत्यंत रास्त व जनहिताच्या आहे प्रशासनाने त्यांच्या प्रकृतीचा व जनभावनेचा विचार करून या मागण्याची गांभीर्याने दखल घ्यावी व त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा ही नान्नज गावातील सर्व नागरिकांचे म्हणणे आहे मागण्यांवर त्वरित तोडगा न निघाल्यास उद्या रविवार दि. ९ रोजी नान्नज गाव कडकडीत बंद आहे गाव बंद ठेऊन ही तोडगा निघाला नाही तर नंतर जामखेड - करमाळा रोडवर रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे नान्नज शहर बंदच्या पाश्र्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जामखेड पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना निवेदन देऊन पोलीस बंदोबस्त देण्याची मागणी करण्यात आली. उपोषणस्थळी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, जामखेड आगार चे अधिकारी, जि.प.चे अधिकारी यांनी भेट दिल्या व भाजपाचे जेष्ठ नेते मधुकर राळेभात यांनी भेट दिली. प्रशासनाने या सर्व मागण्यांची वेळेत दखल घ्यावी हे आमरण उपोषण अधिक तीव्र स्वरूपात छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे.

## शेवगावात 'दहा कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा'



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने देशभर राबविण्यात येत असलेल्या 'दहा कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा महाअभियानाचा' शेवगाव येथे प्रारंभ करण्यात आला. युवा पिढीला व्यसनांपासून दूर ठेवून सकारात्मक आणि निरोगी जीवनशैलीकडे वळविणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. अमरापूर प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अमरापूर येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये ब्रह्मकुमारी मंजुश्री दीदी यांनी सांगितले की, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय ही धार्मिक संस्था नसून आध्यात्मिक संस्था आहे. सन १९३६ मध्ये स्थापन झालेल्या या आंतरराष्ट्रीय संस्थेने यंदा ९० वर्षे पूर्ण केली आहेत. जगभरातील ११० पेक्षा अधिक देशांमध्ये संस्थेच्या शाखा असून, ५५०० हून अधिक सेवा केंद्रांच्या माध्यमातून आध्यात्मिक शिक्षण, राजयोग ध्यान तसेच व्यक्तिमत्त्व विकास, तणावमुक्ती, सकारात्मक विचारसरणी आणि व्यसनमुक्ती यांसारखे विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविले जातात. संस्थेच्या कार्यासाठी विविध क्षेत्रांनुसार २५ प्रभाग (विंग्स) कार्यरत असून, मेडिकल विंगच्या पुढाकाराने 'दहा कोटी नशामुक्ती प्रतिज्ञा महाअभियान' व्यापक स्तरावर राबविण्यात येत आहे.

## मढीत गोपाळ समाज भवनासाठी २० गुंठे जागेची मागणी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोरडगाव :** श्री क्षेत्र मढी हे गोपाळ समाजाचे प्रमुख श्रद्धास्थान असून, होळीच्या सणाला येथे मानाची होळी पेटविण्याचा पारंपरिक मान गोपाळ समाजाला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून दरवर्षी लाखो भाविक मढी येथे दाखल होत असतात. मात्र, गोपाळ समाजासाठी स्वतंत्र समाज भवन नसल्याने यात्रा काळात निवारा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह तसेच सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी मोठ्या अडचणी निर्माण होतात. त्यामुळे श्री क्षेत्र मढी येथील गट क्रमांक १७७ मधील २० गुंठे (०.२० आर) जागा गोपाळ समाज भवनासाठी मंजूर करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. गट क्रमांक १७७ मध्ये गोपाळ समाजाचा जुना ऐतिहासिक पार (चौथारा) अस्तित्वात असून, या जागेशी समाजाच्या धार्मिक व पारंपरिक भावना जोडलेल्या आहेत. त्यामुळे याच परिसरातील २० गुंठे जागा गोपाळ समाज भवनासाठी मंजूर करून द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या मागणीसाठी सर्जेराव जाधव, संजय लोणारे, पाथर्डी, नामदेव गव्हाणे, काकासाहेब धायतडकर, प्रा. राजेंद्र गिरे, नारायण जाधव, नारायण म्हस्के, काकासाहेब उबाळे, एकनाथ महाजन, आप्पासाहेब लोणारे, बाबासाहेब धायतडकर, शिवाजी लोणारे, श्री कृष्णा लोणारे, दीपक लोणारे, विठ्ठल गव्हाणे, पाथर्डी यांच्यासह गोपाळ समाज बांधवांनी मागणी केली आहे. मढी क्षेत्राशी गोपाळ समाजाचे असलेले ऐतिहासिक व धार्मिक नाते लक्षात घेता शासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करावा. समाज भवन ही केवळ इमारत नसून गोपाळ समाजाच्या धार्मिक परंपरा, संस्कृती व ऐतिहासिक वारशाचे जतन करणारे केंद्र ठरणार आहे.



## 'कासारे ते वाघदरा रस्ता' कामाला सुरुवात : आ. दाते

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** कासारे ते वाघदरा, वाफारेवाडी शिवरस्ता खडीकरण व मजबुतीकरण करण्याच्या महत्त्वपूर्ण कामाचा शुभारंभ आ. काशिनाथ दाते यांचे शुभहस्ते पार पडला. आठ दिवसांपूर्वी वाघदरा-कासारे परिसरातील पंधरा ते विस महिला भगिनींनी पारनेर येथे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या जनसंपर्क कार्यालयात त्यांची भेट घेऊन या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. महिलांनी मांडलेल्या या प्रश्नाची तातडीने दखल घेत आमदार दाते सरांनी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा केला आणि अवघ्या आठ दिवसांत 'मौजे कासारे येथील कासारे ते वाघदरा ते वाफारेवाडी शिवरस्ता खडीकरण व मजबुतीकरण करणे' या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ झाला. या कार्यक्रमाला धनंजय निमसे, वसंत दातीर, रंगनाथ फापाळे, शैला दातीर, सचिन खरात, संगीता दातीर, ताराबाई खरात, भागुबाई खरात, हिराबाई खरात, इंदुबाई दातीर, नबाबाई दातीर, राहीबाई दातीर, अलका दातीर, सुरेखा पानमंद, उज्वला खरात, सविता दातीर, मंजुळा खरात, जिजाबाई दातीर, रतन दातीर, कांता दातीर, मंगल दातीर, सुमन खरात, उषाबाई दातीर, सिंधू खरात, लताबाई खरात, जनाबाई खरात, शांताबाई दातीर, ज्योत्स्ना चौरे, आशा पाणमंद, हिराबाई कासुटे, लहानुबाई खरात यांच्यासह बाळासाहेब दातीर, संदीप खरात, रामदास खरात, लहू खरात, मारुती खरात, हनुमंत दातीर, बबन दातीर, बाळशिराम दातीर, मिनीनाथ पानमंद, नाना नरड, किसन खरात, भागा खरात, बाबाजी दातीर, विकास दातीर, संतोष पानमंद, सचिन खरात, शरद दातीर मेजर, गोरख दातीर, बाबासाहेब दातीर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १० ऑगस्टला आ. पाचपुतेंचा खुला दरबार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** नागरिकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ मिळावे आणि शासकीय यंत्रणेकडून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी, यासाठी आ. विक्रम पाचपुते यांचा जनता दरबार सोमवार, १० ऑगस्ट रोजी श्रीगोंदा शहरातील माऊली निवासस्थानी आयोजित करण्यात आला आहे. या जनता दरबारात तालुक्यातील नागरिकांनी कोणताही संकोच न बाळगता आपले प्रश्न मांडावेत, असे आवाहन आमदार पाचपुते यांनी केले आहे.

'जनता दरबार दुसरीकडे घेतला तर त्यासाठी भाडे द्यावे लागेल; ते पैसे कुठून आणणार?' असा मिश्कील सवाल करत आमदार पाचपुते यांनी माऊली निवासस्थानीच जनता दरबार घेण्यामागची भूमिका स्पष्ट केली. मात्र, ठिकाणापेक्षा नागरिकांचे प्रश्न महत्त्वाचे असून, प्रश्न घेऊन येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे म्हणणे ऐकून त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

'इथे कोण जवळचा आणि कोण दूरचा, असा भेद केला जाणार नाही,'

### माऊली निवासस्थानी नागरिकांनी बिनधास्त प्रश्न मांडावेत

असे सांगत आ. पाचपुते यांनी राजकारण बाजूला ठेवण्याचे आवाहन केले.

सत्ताधारी पक्षासोबतच विरोधी पक्षातील कार्यकर्ते आणि नागरिकांनीही जनता दरबारात उपस्थित राहून आपले प्रश्न मांडावेत, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी थेट समोर आल्यास प्रशासनाच्या माध्यमातून त्यांची सोडवणूक करण्यास अधिक गती मिळू शकते.

'प्रश्न मांडले तरच त्यावर उपाय शोधता येईल आणि त्यातूनच तालुक्याचा विकास साधता येईल,' अशी भूमिका आमदार पाचपुते यांनी मांडली. दरम्यान, जनता दरबारासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी चहा, पाणी आणि नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

त्यामुळे तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बेलवंडी पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर अवैध धंद्यांचा सुळसुळाट!

## जुगार, मटका, मावा, गुटखा,अवैध दारू विक्री पुन्हा जोमात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** बेलवंडी पोलीस ठाण्यापासून अवघ्या एक किलोमीटरच्या परिसरातच जुगार, मटका, पान टपऱ्यावर गुटखा, मावा आणि अवैध दारू विक्रीचे प्रकार पुन्हा सुरू झाल्याने हे अवैध धंदे तात्काळ बंद करण्याची मागणी बेलवंडी तंटामुक्ती गाव समितीचे उपाध्यक्ष संतोष काळाने यांनी केली आहे. याबाबत लवकरच पोलीस अधिक्षक यांची भेट घेऊन निवेदन




देणार असल्याचे काळाणे यांनी बोलताना सांगितले. काही महिन्यांपूर्वी पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे सुमारे तीन महिने हे अवैध धंदे पूर्णपणे बंद झाल्याचे चित्र होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पुन्हा हे अवैध व्यवसाय उघडपणे सुरू असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली असून नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

पोलीस ठाण्यापासून एक किलोमीटर परिसरातच अवैध धंदे सुरू असल्याचा आरोप होत असताना, संबंधितांवर अद्याप प्रभावी कारवाई का होत नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. त्यामुळे पोलिसांच्या गस्तीवर आणि अवैध धंद्यांवरील नियंत्रणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जुगार, मटका, मावा, गुटखा आणि अवैध दारू विक्रीमुळे अनेक कुटुंबे आर्थिक व सामाजिक अडचणीत सापडत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर अवैध धंदे तातडीने बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांनी यापूर्वी काही अवैध धंद्यांवर कारवाई करून त्यांना आळा घातला होता. मात्र आता पुन्हा सुरू झालेल्या या प्रकारांवर ते कोणती ठोस आणि धडक कारवाई करणार, याकडे संपूर्ण बेलवंडी परिसराचे लक्ष लागले आहे.

### बेलवंडीतील अवैध धंदे बंद करण्याची संतोष काळाने यांची मागणी

**अवैध धंद्यांना पुन्हा अभय कोणाचे?**

पोलीस ठाण्यापासून इतक्या जवळ अवैध व्यवसाय सुरू असल्याचा आरोप होत असताना, यामागे नेमके कोणाचे पाठबळ आहे? याची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

# कामिका एकादशीच्या हार्दिक शुभेच्छा...



## कामिका एकादशीला पुणतांब्याचे महात्म्य...



**गोदावरीतीरी संत चांगदेवांची तपोभूमी; वारकरी भक्ती, योगसाधना आणि प्राचीन देवपरंपरेचा अनोखा संगम**

**एकादशीच्या निमित्ताने चांगदेवांच्या समाधीचे दर्शन म्हणजे पंढरीच्या वारीला आध्यात्मिक पूर्णत्व देणारा भक्तीचा सोहळा**

पुणतांबा : गोदावरीच्या पवित्र तीरावर वसलेले पुणतांबा हे केवळ एक गाव नाही; ते महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील एक महत्त्वाचे आध्यात्मिक केंद्र आहे. योगसाधनेचे प्रतीक असलेले योगीराज चांगदेव महाराज, संत ज्ञानेश्वर आणि संत मुक्ताई यांच्याशी जोडलेली आध्यात्मिक परंपरा, प्राचीन देवस्थाने, वेदविद्येची परंपरा आणि वारकरी दिंड्यांचा अखंड नामघोष यामुळे पुणतांब्याला आगळे धार्मिक-सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. कामिका एकादशीच्या पावन पर्वावर या पुण्यभूमीचे स्मरण म्हणजे गोदावरी, संतपरंपरा आणि भक्तीच्या अखंड प्रवाहाला वंदन करण्यासारखेच आहे.

श्रावण कृष्ण पक्षातील कामिका एकादशी ही भगवान विष्णूच्या उपासनेतील महत्त्वाची एकादशी मानली जाते. व्रत, नामस्मरण, दान आणि आत्मचिंतन यांना या दिवशी विशेष महत्त्व आहे. परंतु महाराष्ट्राच्या संतभूमीत एकादशीचा अर्थ केवळ उपवासापुरता मर्यादित राहत नाही. देवाच्या नामात मन रमविणे, अहंकाराचा त्याग करणे आणि आत्मशुद्धीचा मार्ग स्वीकारणे, हा संतपरंपरेचा एकादशीकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन आहे.

### गोदावरीच्या कुशीतले पुण्यतीर्थ

पुणतांबा हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले प्राचीन क्षेत्र आहे. गोदावरीच्या पावन जलाने आणि प्राचीन धार्मिक परंपरांनी या भूमीला तीर्थक्षेत्राचे स्वरूप प्राप्त झाले. येथील घाट, मंदिरे आणि संतपरंपरा आजही पुणतांब्याची ओळख जपून आहेत.

या क्षेत्राचा संबंध प्राचीन आख्यायिकांशी जोडला जातो. याज्ञवल्क्य ऋषींच्या यज्ञाशी संबंधित परंपरा आणि 'पुण्यस्तंभा'वरून 'पुणतांबे' हे नाव रूढ झाल्याची मान्यता या क्षेत्राच्या प्राचीनतेची साक्ष देते.

म्हणूनच पुणतांब्यातील गोदावरी घाटावर स्नान आणि त्यानंतर देवदर्शन ही भाविकांच्या श्रद्धेतील महत्त्वाची परंपरा आहे. एकादशीच्या दिवशी तर या भक्तीला विशेष रंग चढतो.

### योगीराज चांगदेवांची तपोभूमी

पुणतांब्याच्या धार्मिक वैभवाचा केंद्रबिंदू म्हणजे योगीराज चांगदेव महाराजांची संजीवन समाधी. योगसाधना, तपश्चर्या आणि आध्यात्मिक सामर्थ्य यांचे प्रतीक म्हणून चांगदेव महाराजांचे नाव महाराष्ट्राच्या संतपरंपरेत आदराने घेतले जाते.

चांगदेव महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांची भेट हा महाराष्ट्राच्या अध्यात्मविश्वातील एक अत्यंत महत्त्वाचा प्रसंग मानला जातो. योगसामर्थ्याचा अभिमान असलेल्या चांगदेव महाराजांना ज्ञानेश्वर माऊलींच्या आत्मज्ञानाची अनुभूती झाली. ज्ञानेश्वर-मुक्ताईंच्या सहवासातून त्यांच्या साधनेला नवा आध्यात्मिक अर्थ प्राप्त झाला.

विशेषतः संत मुक्ताई यांनी चांगदेव महाराजांना दिलेला आत्मबोध हा संतपरंपरेतील विलक्षण अध्याय आहे. बाह्य सिद्धीपेक्षा अंतर्मुख होऊन आत्मस्वरूपाचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे आहे, हा संदेश या प्रसंगातून मिळतो. म्हणूनच चांगदेवांची कथा ही केवळ एका योगीची कथा नाही; ती अहंकारातून आत्मज्ञानाकडे झालेल्या प्रवासाची कथा आहे.

### संजीवन समाधी : आजही लाखो भाविकांचे श्रद्धास्थान

पुणतांबा येथे चांगदेव महाराजांची संजीवन समाधी आहे. या समाधीस्थळी वर्षभर भाविकांची वर्दळ असते; मात्र एकादशीच्या पर्वकाळात या परिसराचे रूपच बदलून जाते.

दूरदूरच्या गावांतून दिंड्या पुणतांब्याकडे येतात. टाळ-मृदंगाचा नाद, अभंगांचे सूर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष यामुळे गोदावरीचा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघतो. अनेक वारकरी पायी प्रवास करून येथे पोहोचतात. गोदावरी स्नान, चांगदेव महाराजांच्या समाधीचे दर्शन आणि नामस्मरण यामुळे त्यांच्या वारीला आध्यात्मिक समाधान लाभते.

पंढरपूरच्या विठ्ठलभक्तीला पुणतांब्याच्या चांगदेव परंपरेची जोड देणारा हा भक्तीसेतू महाराष्ट्राच्या वारकरी संस्कृतीचे वैशिष्ट्य अधोरेखित करतो.

### एकादशी आणि वारकरी परंपरेचा अनोखा संबंध

वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने एकादशी हा केवळ पंचांगातील एक दिवस नाही. तो नामस्मरण, संयम, साधना आणि विठ्ठलभक्तीचा दिवस आहे. त्यामुळे एकादशीच्या निमित्ताने पंढरीबरोबरच पुणतांब्यासारख्या संतक्षेत्रांनाही विशेष महत्त्व प्राप्त होते.

पुणतांब्यातील एकादशी सोहळ्यात भक्तीचे अनेक रंग अनुभवायला मिळतात. पहाटेची पूजा, अभिषेक, महाआरती, गोदावरी स्नान, दिंड्यांचे आगमन, भजन-कीर्तन आणि समाधीचे दर्शन-या सर्वांमधून महाराष्ट्राच्या लोकजीवनात रुजलेली भक्तीपरंपरा जिवंत राहते.

### मंदिरांची समृद्ध परंपरा

पुणतांब्याची ओळख केवळ चांगदेव महाराजांच्या समाधीपुरती मर्यादित नाही. येथे विविध देवदेवतांची प्राचीन मंदिरे आहेत. व्यंकटेश, काशी विश्वेश्वर, काळभैरवनाथ, महादेव, विठ्ठल, दत्त, श्रीराम, मारुती आदी देवस्थानांचा धार्मिक वारसा या क्षेत्राच्या वैविध्याची साक्ष देतो.

गावातील अनेक मारुती मंदिरे, प्राचीन वास्तू आणि वेदविद्येची परंपरा यामुळे पुणतांबा हे धर्म, ज्ञान, योग आणि भक्ती यांचा संगम ठरते.

**संकलन - अजय जोशी, पुणतांबा**




## चतुर्भुज मूर्ति लावण्य रुपड़े | पाहतां आवडे जीवा बहू...



महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय व कर्नाटकातील हरिदास संप्रदाय यांचे विठ्ठल हे प्रमुख दैवत. विष्णूचा अवतार आणि कृष्णाचे रूप असलेले विठ्ठल हे विठोबा, पांडुरंग, पंढरीनाथ या व अशा अनेक नावांनी प्रसिद्ध आहेत. विठ्ठल वा पांडुरंग म्हटले की डोळ्यांसमोर येते ती कटेवर दोन हात ठेवलेली व विटेवर उभी असलेली सावळी, सुंदर व गोजिरी मूर्ती; परंतु अहमदनगर जिल्ह्यातील टाकळीभान येथील मंदिरातील विठ्ठल मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण असून या मूर्तीला चक्क मिशी व चार हात आहेत. त्यातील दोन हात हे कटेवर, तर एका हातात शंख व दुसऱ्या हातात चक्र आहे. ही मूर्ती सुमारे १६०० वर्षांपूर्वीची असून अशा प्रकारची महाराष्ट्रातील ही एकमेव मूर्ती असल्याचे सांगितले जाते.

नेवासा ते श्रीरामपूर रस्त्यावर असलेले टाकळीभान हे गाव प्रतिपंढरपूर म्हणून ओळखले जाते ते येथील पुरातन विठ्ठल-रुख्मिणी मंदिरामुळे यादवकालीन असलेले हे मंदिर येथील वैशिष्ट्यपूर्ण विठ्ठलाच्या मूर्तीमुळे प्रसिद्ध आहे. असे सांगितले जाते की यादवकाळात भान (भानू) नावाचा राजा पांडुरंगाचा भक्त होता. या गावाचे तेव्हाचे नाव टाकळी असावे. भान राजाच्या वास्तव्यानंतर 'टाकळीभान' हे नाव पडले. त्यावेळी येथे विठ्ठलाची चतुर्भुज मूर्ती होती. या मूर्तीच्या मस्तकावर शिवलिंग व ओठावर मिशी होती. इतिहास संशोधकांच्या मते, यादवकाळाच्या आधीपासून ही मूर्ती येथे आहे. याबाबतची माहिती पंढरपुरात सापडलेल्या एका शिलालेखात आहे. महाद्वार रस्त्यावर विठ्ठल मंदिराकडून चंद्रभागेकडे जाताना डावीकडे असलेल्या पोलिस चौकीच्या इमारतीत एक लेखशिला आहे. त्यातील लेख देवगिरीच्या यादव घराण्यातील महादेवराव यादव यांच्या कारकिर्दीतील असून लेखाचा काळ ज्येष्ठ शु. ११, शके ११९२ (इ.स. १२७०) असा आहे. पंढरपुरात भीमेच्या काठी, सितवाहक कुळातील काश्यपगोत्री केशवपुत्र भानूने आप्तोर्याम यज्ञ केल्याची नोंद या शिलालेखात आहे. हा ब्राह्मणकुलीन भानू म्हणजेच भान यादवांचा सामंत असल्याचे सांगितले जाते.

अनेक संशोधकांनी या मूर्तीचा निर्माण कालावधी १६०० वर्षांपूर्वीचा असल्याचे दाखले दिलेले आहेत. यादवकालीन भानू राजाची टाकळी ही राजधानी असल्याचेही संशोधकांच्या शोध निष्कर्षातून सिद्ध झाले आहे. पंढरपूरप्रमाणे येथील आषाढी उत्सव आषाढ प्रतिपदा ते पौर्णिमा या दरम्यान साजरा केला जातो. पंढरपूर येथील विठ्ठल मूर्ती व ही मूर्ती एकाच काळात घडविलेल्या असाव्यात, असा अंदाजही व्यक्त करण्यात येतो. इतिहास संशोधक रा. चिं. ढेरे यांनीही येथील विठ्ठल मूर्तीवर संशोधन करून मूर्तीचे महात्म्य विषद केले आहे. महानुभव साहित्य स्थानपोथी व लीळाचरित्र यामध्ये या मंदिराचा उल्लेख १३व्या शतकातील यादव काळाशी जोडलेला आहे.

गावाच्या मध्यभागी एका लहानशा टेकडीवजा उंचवट्यावर हे मंदिर स्थित आहे. १९७७ मध्ये केलेल्या जीर्णोद्धारानंतर मंदिराला सध्याचे स्वरूप आले आहे. मंदिर हेमाडपंती रचनेचे असून संपूर्ण दगडी बांधकाम व त्यावर कोरीव नक्षीकाम असे त्याचे रूप आहे. सभामंडप, अंतराळ व गर्भगृह असे मंदिराचे स्वरूप आहे. सभामंडपाच्या भिंतींवरील देवड्यांमध्ये श्रीगणेश, संत नामदेव महाराज, संत जनाबाई, पांडुरंग, संत गोरोबा काका, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत सावता माळी, संत कैकाडी महाराज, गंगागिरी महाराज, समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा, संत सेना महाराज, संत रोहिदास, महामुनी मातंगऋषी, संत जगनाडे महाराज या देवतांच्या व थोर संतांच्या संगमरवरी मूर्ती आहेत.

अंतराळात असलेल्या दोन कोरीव खांबांना लागून हनुमंत व गरुडदेव यांच्या मूर्ती आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर वैशिष्ट्यपूर्ण कोरीव काम केलेले आहे. गर्भगृहातील चौथऱ्यावर विठ्ठल व रुख्मिणी यांच्या मूर्ती आहेत. चतुर्भुज, ओठावर मिशी, मस्तकावर शिवपिंडी आहे व छातीवर कौस्तुभमणी अशी विठ्ठल मूर्ती असून त्याशेजारी रुख्मिणी मातेची मूर्ती आहे.

**चतुर्भुज मूर्ति लावण्य रुपड़े | पाहतां आवडे जीवा बहू ||१||**
**वैंजयंती माळा कीरीट कुंडलें | भुषण मिरवलें मकराकार ||२||**
**कासे सोनसळा पितांबर पिवळा | कस्तुरीचा टिळा शोभे माथे ||३||**
**शंख चक्र हातीं पद्म तें शोभलें | भानुदासें वंदिलें चरणकमळ ||४||**

संत भानुदास यांचा हा अभंग टाकळीभान येथील विठ्ठलाच्या मूर्तीला तंतोतंत लागू पडतो.

आषाढ शुद्ध प्रतिपदा ते पौर्णिमा या दरम्यान येथील आषाढी उत्सव साजरा होतो. या उत्सवानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई केली जाते. यावेळी दररोज ग्रामस्थांकडून अन्नदान केले जाते. दररोज सायंकाळी ५ वाजता विठ्ठल-रुख्मिणीची दिंडी काढली जाते. गावात प्रदक्षिणा करून दिंडी मंदिरात आल्यावर आरती होऊन महाप्रसाद दिला जातो. चतुर्दशीच्या दिवशी येथे भंडारा असतो. या दिवशी टाकळीभान व पंचक्रोशीतील भजनी मंडळे टाळ, मृदंग व वीणा यांसह दिंड्या घेऊन विठ्ठलाच्या दरबारात हजेरी लावतात. पौर्णिमेच्या दिवशी दहीहंडीच्या कार्यक्रमाने उत्सवाची सांगता होते.

हे मंदिर श्रीरामपूरपासून १४ किमी, तर अहिल्यानगर पासून ६० किमी अंतरावर आहे. श्रीरामपूर, नेवासा येथून एसटीची सुविधा उपलब्ध आहे. खासगी वाहने मंदिरापर्यंत जाऊ शकतात. परिसरात निवास व न्याहरीची सुविधा नाही.

**संकलन - अर्जुन राऊत, टाकळीभान**



मा.श्री.श्रीधर कुंडलिक पा.गाडे
प्रगतशिल शेतकरी
टाकळीभान


मा.श्री.शंकरराव पुंजाजी पा.पवार
प्रगतशिल शेतकरी
टाकळीभान

रुक्मिणी माधव मंगल कार्यालय टाकळीभान,

श्रीरामपूर, नेवासा रोड, टाकळीभान
केटरींग, डेकोरेशन, मंगल कार्यालय,
सर्व साहित्य उपलब्ध
बुकींग सुरु आहे.
संपर्क नं.: ७०३८५५१६४०, ९०५७९३०३५५


टाकळीभान नगरीत भावीकांचे हार्दिक स्वागत
मा.श्री.बापुसाहेब बाळाजी पा.पटारे
सदस्य : जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था, सातारा
विश्वस्त : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीर देवस्थान ट्रस्ट, टाकळीभान, ता.श्रीरामपूर

टाकळीभान नगरीत भावीकांचे हार्दिक स्वागत
मा.श्री.नानासाहेब अहिलाजी पा.लेलकर
मा.चेअरमन अशोक कामगार पतपेढी, अशोकनगर
सदस्य : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीर देवस्थान ट्रस्ट, टाकळीभान, ता.श्रीरामपूर


टाकळीभान नगरीत भावीकांचे हार्दिक स्वागत
मा.श्री.नानासाहेब पुंजाजी पा.पवार
माजी सभापती प.सं.श्रीरामपूर
अध्यक्ष : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीर देवस्थान ट्रस्ट, टाकळीभान, ता.श्रीरामपूर


राजेंद्र उर्फ बाबासाहेब प्रभाकर राऊत पा.
संचालक : प्रवरा सहकारी बँक लि.मु.पो.कोल्हार बुद्रुक
मो.९२२५८७९९१९
कामिका एकादशीच्या हार्दीक शुभेच्छा...



कामिका एकादशी निमित्त आलेल्या सर्व भाविकांचे तसेच सरला बेटाचे महंत परम पूजनीय रामगिरीजी महाराज यांचे पुणतांबा नगरीत हार्दिक स्वागत
* शुभेच्छुक *
डॉ. धनंजय आप्पासाहेब धनवटे पाटील
लोकनियुक्त मा.

कामिका एकादशी निमित्त आलेल्या सर्व भाविकांचे हार्दिक स्वागत
श्री योगीराज चांगदेव महाराज देवस्थान ट्रस्ट
श्री क्षेत्र पुणतांबा, ता. राहता, जि. अहिल्यानगर
श्री महेश पंढरीनाथ मरुदगण
विश्वस्त
सर्व सन्माननीय विश्वस्त मंडळ


कामिका एकादशी निमित्त आलेल्या सर्व भाविकांचे तसेच सरला बेटाचे महंत परमपूजनीय रामगिरीजी महाराज यांचे श्री क्षेत्र पुणतांबा येथे हार्दिक स्वागत
* शुभेच्छुक *
श्री. शिवाजी प्रधान
गुरुकृपा फर्निचर पुणतांबा ता.राहता जि. अहिल्यानगर


कामिका एकादशी निमित्त आलेल्या सर्व भाविकांचे तसेच सरला बेटाचे महंत परमपूजनीय रामगिरीजी महाराज यांचे श्री क्षेत्र पुणतांबा येथे हार्दिक स्वागत
* शुभेच्छुक *
श्री भूषण सुभाष वाघ पाटील
ग्रामपंचायत सदस्य पुणतांबा



कामिका एकादशी निमित्त पुणतांबा नगरीत गुरुवर्य महंत ह.भ.प.रामगिरीजी महाराज यांचे साबळे पाटील परिवार यांच्या कडे सहर्ष स्वागत
फर्म : श्रीराम बेकरी ॲण्ड केक शॉप, पुणतांबा


कामिकाएकादशी निमित्त आलेल्या सर्व भाविकांचे तसेच सरला बेटाचे महंत परमपूजनीय रामगिरीजी महाराज यांचे श्री क्षेत्र पुणतांबा येथे हार्दिक स्वागत
* शुभेच्छुक *
श्री छगन भाऊ काशिनाथ जोगदंड
संस्थापक अध्यक्ष लक्ष्मी माता प्रतिष्ठान पुणतांबा

कामिका एकादशी निमित्त हार्दिक शुभेच्छा...
सौ.रोहिणीताई शंकरराव आंबेकर
बारागाव नांदूर जिल्हा परिषद गटाचे भावी नेतृत्व
४० हजार पेक्षा अधिक बांधकाम कामगारांची नोंदणी करून त्यांना योजनेचे लाभ मिळवून दिले.


कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्ट

श्रीक्षेत्र कोल्हार भगवतीपूर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर
☎ : (०२४२२)२५१८१७
www.bhagwatimata.in
भक्तनिवास हॉल व रुम उपलब्ध
संपर्क नं. ९५२९३७७९५३

• अध्यक्ष • श्री. सयाजी (भाऊसाहेब) रघुनाथ खर्डे
• उपाध्यक्ष • श्री. साहेबराव संभाजीराम दळे
• विश्वस्त मंडळ •
डॉ. श्री. भास्करराव निवृत्ती खर्डे (खजिनदार)
श्री. चंद्रभान आप्पासाहेब खर्डे
श्री. अजित रमेश मोरे
श्री. सर्जेराव सोन्यावापू खर्डे
श्री. संपत विठ्ठल कापसे (सचिव)
श्री. संभाजी रघुनाथ देवकर
श्री. नानासाहेब दगडु कडसकर
श्री. विजय माधवराव निबे
श्री. वसंत नानासाहेब खर्डे
सौ. शितल सुरेंद्र खर्डे
श्री. लक्ष्मण बाळासाहेब खर्डे
श्री. सुजित लक्ष्मण राऊत
श्री. जनार्दन संजेराव खर्डे
• आणि सर्व कर्मचारी वृंद •